बलिप्रतिपदा दीपावली पाडवा
निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा!

सांध्य दैनिक

RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com https://epaper.vidarbhaprajasattak.com

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२५१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.२ नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -७

## जम्मू-काश्मीरमध्ये लष्कराची मोठी कारवाई दिवाळीत दहशत माजवण्याचा कट फसला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२जम्मू काश्मीर**

जम्मू-काश्मीरमध्ये लष्कराने मोठी कारवाई करत दिवाळीत हल्ले करण्याच्या तयारीत असलेल्या दहशतवाद्यांचा खात्मा करण्याची मोहीम सुरु केली आहे. बांदीपोरा येथील पनार भागात लष्कराने दहशतवाद्यांच्या ठिकाणी हल्ले केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बांदीपोरा येथील पनार भागात संशयास्पद हालचालींची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शुक्रवारी संध्याकाळी शोध मोहीम सुरू केली होती मात्र दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला. या गोळीबाराला सुरक्षा दलाकडून चोख प्रत्युत्तर देण्यात आले. त्यामुळे काही दहशतवादी जंगलात लपून बसले आहेत.तर आता समोर आलेल्या माहितीनुसार, श्रीनगरमधील (डीळपरसरी) खानयार भागात शनिवारी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू झाली. याबाबत अधिकाऱ्यांनी सांगितले की, दहशतवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शनिवारी सकाळी खन्यार परिसराला वेढा घातला आणि शोध मोहीम सुरू केली.


यावेळी दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला, त्यानंतर सुरक्षा दलांनीही प्रत्युत्तर दिले आणि शोध मोहिमेचे चकमकीत रूपांतर झाले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये गोळीबार सुरू आहे, मात्र अद्याप दोन्ही बाजूंनी कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.

## प्रकाश आंबेडकरांवर अँजिओग्राफी अन् अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया

### "ICU" मधून मतदारांना दिला मतदारांना संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२पुणे**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांचं वार वाहतय. येत्या २० नोव्हेंबरला राज्यात मतदान होणार आहे. दरम्यान, निवडणुकांची धामधूम असताना वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. बाळासाहेब आंबेडकर यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यांच्यावर अँजिओग्राफी आणि अँजिओप्लास्टी दोन्हीही शस्त्रक्रिया करण्यात



आल्या आहेत. आता प्रकाश आंबेडकरांनी रुग्णालयातूनच आपल्या मतदारांना संदेश दिला आहे.

प्रकाश आंबेडकरांनी व्हिडिओच्या माध्यमातून हा संदेश दिला आहे. त्यांनी मतदारांना बोलताना, मी सध्या आयसीयूमध्ये आहे. अँजीओग्राफी आणि अँजीओप्लास्टी दोन्ही झालेले आहे. डॉक्टरांनी निरीक्षणाखाली ठेवलं आहे. निवडणुकीलाही सुरुवात झाली आहे. ही निवडणूक अत्यंत महत्वाची आहे. ओबीसींसाठीही महत्वाची आहे. कारण विधानसभेनंतर ओबीसी आरक्षण थांबवलं जाणार आहे, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले आहेत.

आपले आमदार निवडून आले, तर आरक्षणावरून हल्ला आपल्याला थांबवता येणार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना आपलं बहुमूल्य मत देऊन विजयी करा, असं आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी केले आहं आहे. ते हॉस्पिटलमध्ये दाखल असून, आयसीयूमधून त्यांनी हा संदेश जनतेला दिला आहे.

## 'मी तुमची माल नाही साहेब; महिला आहे', उद्धव ठाकरेंचं नाव घेत शायना एन. सी. यांचा अरविंद सावंतांवर घणाघात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई**

ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी केलेल्या वक्तव्याप्रकरणी शिवसेनेच्या मुंबादेवी मतदारसंघाच्या उमेदवार शायना एन. सी. यांनी मुंबईच्या नागपाडा पोलीस ठाण्यात जावून तक्रार केली. यानंतर त्यांनी पोलीस ठाण्याबाहेर प्रसारमाध्यांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी अरविंद सावंत यांच्यावर सडकून टीका केली. ही एफआयआरची कॉपी आहे. ही महाविनाश आघाडी महिलांचा सन्मान करत नाही. देशभरात आज लक्ष्मीपूजन आहे. शुभ मुहूर्त आहे. पण अरविंद सावंत काय म्हणतात? तुम्ही इम्पोर्टेड माल आहात. माल म्हणजे आयटम. मला सार्वजनिक जीवनात आतापर्यंत २० वर्षे झाले. तुम्ही सर्व जाणता की, मी किती निष्ठेने काम केलं आहे. मुंबादेवीचे आशीर्वाद आहेत. मी महिला आहे पण माल नाही, असं शायना एन. सी. म्हणाल्या.

आमच्यासारखे प्रोफेशनल महिला, सक्षम महिला किंवा कोणतीही महिला, त्यांच्याप्रती तुम्ही अभद्र टीका करणार असाल तर ही एफआयर आणि कायदा आपलं काम करेल. जेव्हा एखाद्या महिलाबद्दल तुम्ही अभद्र वक्तव्य करतात तेव्हा तुम्ही तिचा अवमान करतात. तुम्हाला वाटतं प्रत्येक महिला शांत राहणार. पण ही महाराष्ट्राची महिला उत्तर देणार, असं प्रत्युत्तर शायना एन. सी. यांनी अरविंद सावंत यांना दिलं.



**मी तुमची माल नाही साहेब'**

अरविंद सावंत यांच्या वक्तव्यावर ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत, राष्ट्रवादी एसपी गटाचे प्रमुख शरद पवार शांत आहेत, काँग्रेसचे नाना पटोले शांत आहेत, पण महाराष्ट्र आणि मुंबईची महिला शांत राहणार नाही. हे एफआयआर माझं उत्तर आहे. एकीकडे सांगतात की, तुम्ही इम्पोर्टेड माल आहात. कशासाठी? तुम्हाला चर्चा करायची असेल तर चर्चा करा, बोलायचं असेल तर बोला. आई मुंबादेवीचे रक्षक आणि आशीर्वादासोबत आम्ही हे काम करणार. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नेहमीच महिलांचा सन्मान करतात. उद्धव ठाकरे अरविंद सावंत यांच्या वक्तव्यावर काहीच बोलत नाही. अरविंद सावंत म्हणतात, इम्पोर्टेड माल, मी तुमची माल नाही साहेब, आई मुंबादेवी आमची रक्षक आहे. मुंबादेवीची महिला तुम्हाला प्रत्युत्तर देणार, असं शायना एन. सी. म्हणल्या.

**अरविंद सावंत यांचं वादग्रस्त वक्तव्य काय?**

शायना एन. सी. यांची अवस्था बघा. ते आयुष्यभर भाजपात राहिल्या आणि दुसऱ्या पक्षात चालल्या गेल्या. इंपोर्टेड माल इथे काम करत नाही. इथे फक्त ओरिजनल माल काम करतो, असं वक्तव्य अरविंद सावंत यांनी केलं होतं. याच वक्तव्यावरुन वाद निर्माण झाला आहे. त्यांच्या या वक्तव्यावरुन वाद निर्माण झाल्यानंतर सावंत यांनी स्पष्टीकरणही दिलं आहे. माझं वक्तव्य त्यांनी चुकीच्या पद्धतीने घेतलं आहे. मी हिंदीमध्ये बोललो आहे माल म्हणून. पण इंग्रजीमध्ये मालला गुड्स असं बोललं जातं. मी बाहेरून आलेला माल आणि इथे ओरिजनल असलेला माल असं मी बोललो आहे. माझ वक्तव्य अर्ध दाखवण्यात आलं आहे. पण आता तुम्हाला महिला सन्मान लक्षात आला का? प्रज्ज्वल रेड्डीच्या प्रचारात पंतप्रधान गेले तेव्हा त्यांना महिला सन्मान आठवला नाही का? मंत्री संजय राठोड यांच्याच मंत्रिमंडळात होते ना? मग तेव्हा त्यांना महिला सन्मान आठवला नाही का?, असं नंतर अरविंद सावंत म्हणाले आहेत.

## सांध्य मराठी दैनिक विदर्भ प्रजासत्ताक दिवाळी अंकाचे विमोचन......



अल्पावधीत लोकप्रियतेच्या शिखराकडे वाटचाल करीत असलेला अमरावती येथून नियमीत प्रकाशित होणारा सांध्य मराठी दैनिक विदर्भ प्रजासत्ताक या दिवाळी अंकाचे विमोचन राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे व डॉ.वसुधा बोंडे यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले.यावेळी खा.डॉ.अनिल बोंडे यांनी विदर्भ प्रजासत्ताकच्या प्रकाशित झालेले लेख,बातम्यांचे निरखून निरीक्षण करीत पुढील वाटचालीस शुभेच्या दिल्यात .

## बारामतीत यंदा दोन दिवाळी पाडवे का? अजित पवारांनी सांगितले कारण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२बारामती**

राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीचा परिणाम पवार कुटुंबीयांच्या दिवाळी उत्सवावरही झाला आहे. यंदा शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांनी एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या ठिकाणी दिवाळी पाडव्याचे आयोजन केले आहे. शरद



पवार पक्ष गोविंदबाग निवासस्थानावर दिवाळी पाडवा साजरा करणार आहे. याठिकाणी कुटुंबातील सदस्य, पक्षाचे अधिकारी आणि मित्र वर्षानुवर्षे दिवाळीनिमित्त एकत्र येत असतात. तर अजित पवार हे काटेवाडीत पाडव्याचे आयोजन करणार आहेत.

यंदा दोन पाडवे का?उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती तालुक्यातील विविध गावांना भेट दिली. यावेळी त्यांनी गावक-यांशी व माध्यमांशीही त्यांनी संवाद साधला. यावेळी त्यांना दोन पाठव्याचे कार्यक्रमाबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. याला उत्तर देताना अजित पवार म्हणाले की, 'पाडव्याचे दोन कार्यक्रम हे जनतेच्या सोयीसाठी आहे. एका ठिकाणी गर्दी जास्त होते आणि लोकांना ताटकळत उभे राहावे लागत होते. एक-एक किलोमीटर ती संग लागत होती आणि लोकांना ताटकळत राहावे लागत होते. यामुळे लोकही त्रासून जात होते. आपण काम कशासाठी करतो, लोकांच्या सोयीसाठी. आणि वर्षानुवर्षे आम्ही पाठवा उत्सव काटेवाडीलाच करत होतो. जुन्या लोकांना याची माहिती आहे.

## ५३ किलो चांदी, सोन्याची बिस्किटं, हिरे-मोत्यांचे दागिने जप्त, विधानसभेच्या धामधुमीत अहिल्यानगरमध्ये घबाड सापडलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अहिल्यानगर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू संबंधित कारवाई केली जात आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर-पुणे महामार्गावरील सुपा टोलनाक्यावर तैनात असलेल्या पथकाने २३ कोटी ७१ लाख रुपयांचे सोने, चांदी, हिरे, मोत्याचे दागिने पकडले आहेत. या दागिन्यांचा पंचनामा करून इतर कार्यवाही करून दागिने आयकर विभागाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मुंबई येथील झवेरी बाजार येथून जीपमधून सोने-चांदी आणि हिरे, मोत्याचे दागिने घेऊन बीव्हीसी लॉजिस्टिक कंपनीचे कर्मचारी अहिल्यानगर,



छत्रपती संभाजीनगर, नांदेड, जळगाव या ठिकाणी चालले होते. अहिल्यानगर-पुणे महामार्गावरील सुपा टोलनाक्यावर तैनात असलेल्या पथकाने त्यांची चौकशी केली. याबाबत वेगवेगळी माहिती वाहतूक कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून दिली जात असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

**५३ किलो चांदी, हिरे-मोत्यांचे दागिने जप्त**

या कारवाईत चांदीची चाळीस किलोची वीट, सोन्याची बिस्किटे, तर एकूण ५३ किलो चांदी, हिरे-मोत्यांचे दागिने ताब्यात घेतले आहे. तपासणीत १४ अधिकृत पावत्याही आढळून आल्या. तर वाहनासोबत असलेल्या वाहतूक कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडे मौल्यवान वस्तूंची वाहतूक करण्याचा परवाना नव्हता. सुपा पोलिसांनी गोल्ड व्हॅल्युअर आणि कंपनीच्या प्रतिनिधींसमोर या संबंधीचा १५ पानांचा पंचनामा केला आहे.

**चार जण ताब्यात**

कारवाईतील सोन्या-चांदीच्या विटांसह इतर सोने, हिऱ्याचे दागिने आयकर विभागाकडे जमा करण्यात आले आहे. बिलांची खात्री केल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आलीये. या प्रकरणी बीव्हीसी लॉजिस्टिक कंपनीचे कर्मचारी चालक शांतकुमार कट्टीवल्ली, भय्यासाहेब बनसोडे, दिगंबर काजळे, बीव्हीसी लॉजिस्टिक कंपनीचे असिस्टंट मॅनेजर गोरख भिंगारदिवे या चौघांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाई एकच खळबळ उडाली आहे.

संपादकीय ......

# दीपावली : मनामनातलं प्रकाशपर्व..!

*दिवाळीचा अर्थ सर्वांसाठी वेगवेगळा आहे. सुख-दु:खांनी व्यापलेलं मन उत्सवाच्या दिवशी आनंदाचा क्षण अनुभवतं. दसर्याचा सण विजयपर्व, तर दिवाळीचा सण हा दिव्यांचं प्रकाशपर्व! विजयादशमीनंतरच दिवाळी सणाचे वेध लागतात आणि उत्सवी वातावरणाला उधाण येऊ लागतं. शरदाचं चांदणं मन मोहित करतं, त्यामुळं मनात उत्साह आणि प्रेरणेची भावना वाढीस लागते. दिवाळी हा तर भारताचा एक प्रमुख सण असून, जगाच्या पाठीवर जिथं-जिथं हिंदू समुदाय, भारतीय नागरिक असतात, तिथं भारतीय परंपरा, प्रथेनुसार हा सण साजरा केला जातो.*

*अंधारावर प्रकाशाचा विजय म्हणून दीपोत्सव हा दरवर्षी आणि प्राचीन काळापासून उत्साहानं, आनंदानं साजरा करत आलो आहोत. पुराणातील दाखले आणि धार्मिक श्रद्धेचा आधार असलेलं पर्व साजरा करताना काळानुसार अनेक बदल झाले; मात्र या पर्वाचा मूळ गाभा आणि उद्देश हा अंतर्गत-बाह्य जगात सर्वत्र सत्य, शांतता, प्रेम, आनंदाचा प्रसार करण्याचा असून, तो आजही कायम आहे. असं म्हणतात, विजयादशमीच्या दिवशी श्रीरामांनी रावणावर विजय मिळवला. या विजयाकडे आपण वाईटावर चांगल्याचा विजय म्हणून पाहतो. वास्तविक, रामकथा ही संपूर्ण जगात व्यापलेली आहे. थोड्याफार फरकांनी ही कथा विश्वव्यापी संस्कृतीचा भाग बनली आहे. एवढेच नाही, तर कथा, कादंबर्यांतही रामकथेचा व्यापक प्रभाव दिसतो. श्रीरामांनी लंकेत जाऊन रावणाचा वध केला आणि तेथून परत येत असताना अयोध्येत उत्सव साजरा होणारच. एकार्थानं संपूर्ण संस्कृतीच राममय असेल, लोकांत, संस्कारात, गीतात, आख्यायिकेत रामच रामच असेल तर विवाह सोहळा, पुत्र जन्म आदींसारख्या प्रसंगांतही रामांचा उल्लेख होतोच आणि त्याशिवाय आपल्याकडील धार्मिक कार्यक्रम, विधी, कौटुंबिक कार्यक्रम पूर्ण होत नाहीत.*

*दिवाळीचा संबंध हा प्रामुख्यानं श्रीराम अयोध्येत परतण्याशी आहे. श्रीराम, सीता आणि लक्ष्मण हे वनवास संपवून अयोध्येत आल्यानंतर अयोध्यावासीयांनी सर्व ठिकाणी मातीचे दिवे प्रज्वलित करून उत्सव साजरा केला. अयोध्यावासीयांनी या सुवर्णक्षणी आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी तुपाचे दिवे लावून प्रभूंचं स्वागत केलं. म्हणूनच हा दिवस म्हणजे कार्तिक अमावास्येच्या तिथीला दिवाळीचा सण साजरा होऊ लागला. दिवाळीच्या दिवशी लक्ष्मी पृथ्वीवर विराजमान होते आणि त्यामुळं लक्ष्मीचं स्वागत करतानादेखील दिवे लावण्याची प्रथा आहे. त्यामुळं दिवाळीला आतषबाजी केवळ श्रीरामांच्या स्वागतानिमित्तच नाही, तर धन-धान्यांची देवी लक्ष्मीचं पूजन करण्याच्या निमित्तानंदेखील होऊ लागली. पुराणकथेनुसार समुद्रमंथनातून निघालेल्या चौदा रत्नांपैकी एक देवी लक्ष्मीदेखील होती. कार्तिक अमावास्येला प्रकट होत असल्यानं तिचं स्वागत आणि पूजेची परंपरा विकसित झाली. याप्रमाणे दिवाळी शतकानुशतकं साजरी केली जाऊ लागली. पद्मपुराण आणि स्कंदपुराणातदेखील याचा उल्लेख सापडतो. पौराणिक कथेनुसार दिवाळी ही दिवा, सूर्यदेवाचं प्रतीक आहे. आणखी एका संदर्भानं प्रकाशपर्व म्हणूनही दिवाळी साजरा केली जाते; कारण दिवा लावणं हे भौतिक रूपानं परिसर उजळून टाकणं आहे. दिवा प्रज्वलित करताना त्याचा आणखी खोलवर विचार केला, तर मनातील अंधकार आणि अज्ञान दूर करण्याचाही विचार त्यामागं दडलेला आहे.दिवाळीचे प्रकाशपर्व पाचही दिवस उत्सवाच्या रंगात न्हाऊन निघणारे असते. वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज. वसुबारसनं सुरू झालेलं प्रकाशपर्व केवळ भाऊबीजपर्यंत नाही, तर देवदिवाळीपर्यंत म्हणजे तुळशीच्या लग्नापर्यंत चालतं. कार्तिक पौर्णिमेला समस्त देवगण वाराणसीच्या घाटावर एकत्र येऊन दिवाळी साजरा करतात. त्यामुळं दिवाळी सण हा एक महापर्वाच्या रूपानं साजरा केला जातो.*

*श्रीरामांच्या अयोध्येतील आगमनाचा आनंद हा प्रत्येकाच्या मनातील उत्साह द्विगुणीत करणारा आहे आणि तो सर्वांसाठी मंगलमय पर्व ठरला. हा उत्सव एकमेकांना भेटवस्तू देण्याचंही कारण ठरला. सण कोणताही असो, या काळात फराळ, मिठाईची आणि भेटवस्तूंची देवाणघेवाण होतेच आणि याशिवाय सण साजरा होतच नाही. यात सर्वजण आनंदानं सामील होतात. बाजार दिव्यांच्या माळांनी उजळून निघालेला असतो.*

*दिवाळी दरवर्षी येते. दरवर्षी आपण दिवे लावून अंधकाराला पळून लावण्याचा प्रयत्न करतो; पण अंधकार दूर होताना दिसत नाही. काळजीपूर्वक पाहिलं तर विज्ञानाचा प्रकाश आपण खूप पाडला आहे; परंतु अज्ञान, अधर्म, विश्वासघात, अंधविश्वासरूपी असणारा अंधकार मिटवू शकलो नाही. हा अंधार आजही आपल्याभोवतीच घुटमळत आहे. वेद, पुराणकथा, उपनिषदं, महाभारत आणि रामायणासारख्या ग्रंथांत ज्ञानाचा सागर पाहावयास मिळतो. हे आपले धर्मग्रंथ आहेत. त्यांचा आपण अभ्यास करत आलो आहोत; पण आजही भारतातील मोठी लोकसंख्या अशिक्षित आणि सुविधांपासून वंचित आहे. चला, दिवाळीच्या या महाप्रकाशपर्वात मनातील आणि बाह्य जगातील अंधार व अज्ञान संपवून टाकण्यासाठी पुढे या आणि लक्ष्मीची पूजा करताना मनातील सरस्वतीचा सन्मान करण्यास विसरू नका; कारण हीच सरस्वती समाजात रुजलेल्या अनिष्ट प्रथा, अज्ञानावर आणि अविचारांवर प्रहार करते. मगच आपला समाज, आपली संस्कृती, सभ्यता ही खर्या अर्थानं प्रकाशमान होईल आणि ठिकठिकाणी द्वेषभाव, कटूतेऐवजी प्रेमाचा प्रकाश दिसून येईल.*

# ८ नोव्हेंबर ला पंतप्रधान मोदी यांची नाशिक येथे जाहीरसभा

## महायुतीच्या प्रचाराचा प्रारंभ कोल्हापुरातून, मंगळवारी 'तपोवन'वर होणार पहिली सभा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ नाशिक** – महायुतीच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभांचेही नियोजन करण्यात आले असून ८ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान मोदी यांची सभा नाशिक येथे आयोजित करण्यात आली आहे. पंचवटी येथील तपोवनात असलेल्या मोदी ग्राऊंडवर होणार आहे.

नाशिक पाठोपाठ पंतप्रधान मोदी यांची पुण्यातही सभा होणार आहे. १२ नोव्हेंबर रोजी पुण्यातील एस. पी. महाविद्यालयाच्या मैदानावर या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. जालना व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यासाठी पंतप्रधान मोदी यांची एकत्रित सभा १४ नोव्हेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील चिकलठाणा एमआयडीसीतील ग्रॅहमफर्थच्या मोकळ्या जागेत होणार आहे.विशेष म्हणजे याच दिवशी विरोधी महाविकास आघाडीतील उद्धवसेनेचे पक्षप्रमुखआणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचीही सभा मराठवाडा सांस्कृतिक मंडळावर होणार आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचा महाराष्ट्रातील प्रचाराचा प्रारंभ करवीरनगरीतून होणार आहे. मंगळवारी दुपारी ४ वाजता तपोवन मैदानावर महायुतीची पहिली जाहीर सभा होणार असून यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित राहणार आहेत.याआधी २०१४ साली महायुतीच्या विधानसभेच्या प्रचाराचा प्रारंभ इचलकरंजीतून करण्यात आला होता. त्याच पद्धतीने आता कोल्हापुरातून प्रचाराचा प्रारंभ करण्याचा निर्णय महायुतीच्या नेत्यांनी दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत घेतला आहे.

# कारले लागवडीचे नियोजन करताय कोणते वाण निवडाल अन् कशी कराल लागवड

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

वेलवर्गीय पिकांमध्ये कारले हे अत्यंत महत्त्वाचे पीक आहे, कारण ते अल्पावधीतच अधिक उत्पन्न आणि नफा मिळवून देते. मधुमेह आणि हृदयविकार यांसारख्या आजारांवर नियंत्रण ठेवणाऱ्या औषधी गुणधर्मामुळे याला भारतीय आणि परदेशी अशा दोन्ही बाजारपेठांमध्ये जास्त मागणी आहे.

'मोमोर्डीसीन' हा घटक अधिक प्रमाणात असल्याने कारल्याला कडू चव येते. कारल्याच्या रसामध्ये कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठीचे गुणधर्म असतात.

हवामान कारल्याची लागवड पावसाळा (जून) आणि उन्हाळी (जानेवारी) हंगामात केली जाते. कारल्याचा वेल उष्ण आणि दमट हवामानात चांगला वाढतो परंतु अति थंडीमुळे त्याच्यावर विपरीत परिणाम होतो. कारल्याच्या वेलीची वाढ आणि उत्पादन क्षमता २४ ते २७ अंश सेल्सिअस तापमानात उत्तम असते.

**जमीन**– हलकी ते मध्यम काळी माती ज्यामध्ये पाण्याचा निचरा होतो अशी जमीन कारल्याच्या लागवडीसाठी उत्तम असते. ६ ते ६.७ सामू आणि सेंद्रिय खतांचा मुबलक पुरवठा असावा.

**जाती– १) हिरकणी**– फळे गडद हिरव्या रंगाची, १५ ते २० से.मी. लांब व काटेरी असतात.





सरासरी उत्पादन १३० क्विंटल प्रति हेक्टर एवढे मिळते.

**२) फुले ग्रीन गोल्ड**

फळे गडद हिरव्या रंगाची असून २५ ते ३० से.मी. लांब व काटेरी असतात. हेक्टरी २३० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते.

**३) फुले प्रियांका–**

या संकरीत जातींची फळे गर्द हिरवी, २० से.मी. लांब व भरपूर काटेरी असतात. ही जात खरीप व उन्हाळी लागवडीस योग्य आहे. तसेच 'केवडा' रोगास बळी पडत नाही. सरासरी उत्पादन २०० क्विंटल प्रति हेक्टरी मिळते.

**४) कोकण तारा**

फळे हिरवी, काटेरी व १५ से.मी. लांबीची असतात. फळे दोन्ही टोकाला निमुळती व मध्यभागी फुगीर असतात. निर्यातीसाठी अशी फळे योग्य ठरतात. सरासरी उत्पादन १५० ते २०० क्विंटल प्रति हेक्टर मिळते.

### पूर्वमशागत व लागवड

१) जमीन नांगरून आणि जमिनीतील तण व गवत काढून शेत स्वच्छ ठेवावे.

२) हेक्टरी २० ते २५ टन शेणखत किंवा कंपोस्टचा वापर करावा.

३) ताटी पद्धतीत १.५ मी. तर मंडप पद्धतीत दोन ओळीमध्ये २.५ मी. अंतर ठेवावे.

४) बेडची रुंदी आणि दोन वेलीमधील अंतर ६० से.मी. ठेवावे.

५) बियाणे टोकन पद्धतीने लावले जाते.

६) हेक्टरी २ ते ३ किलो बियाणे पुरेसे असते.

७) लागवडीपूर्व प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम कार्बेन्डॅझिमची बीजप्रक्रिया करावी





## दिवाळीत लुटा फराळ–गोडाचा आनंद; फक्त तज्ज्ञांच्या 'या' टीप्स करा फॉलो

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक**



दिवाळीला सुरुवात झाली असून या दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणात गोडधोड खाणं होतंच. यावेळी सर्वात मोठं टास्क असतं ते म्हणजे मधुमेहाच्या रूग्णांनी खाण्याचं कसं मॅनेजमेंट केलं पाहिजे. मात्र यावेळी दिवाळीमध्ये मधुमेहाच्या रूग्णांसाठी एक चांगली बातमी आहे. यावेळी तुम्हाला तुम्हाला गोड पदार्थांवर पाणी सोडण्याची गरज नाही. इथे प्रश्न आहे तो सजगपणे निवड करण्याचा – अधिक चांगले पर्याय निवडण्याचा आणि नव्या मधुमेह–स्नेही घटकांचा शोध घेण्याचा. असे करून तुम्ही तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवू शकाल.

तुमच्या रक्तातील साखरेची पातळी फक्त साखरेच्या सेवनाने वाढत नाही. यामध्ये तुमच्या आहारातील कार्बोहायड्रेट्स अर्थात कर्बोदकांच्या एकूण प्रमाणाचं मॅनेजनेंट करणंही महत्त्वाचं आहे. साखर, कार्ब्जचा रक्तातील साखरेच्या पातळीवर परिणाम होऊ शकतो. फक्त साखर टाळणं पुरेसं नाही तर इतरही अनेक बाबी विचारात घेतल्या पाहिजेत. साखरेसाठी पर्याय म्हणून वापरलेल्या पदार्थांमुळे आहारातील कॅलरीज आणि कार्ब्जची संख्या कमी होते हे खरे असले तरीही त्यांच्यामुळे भूक लागण्यामध्ये आणि रक्तातील साखरेच्या नियमनामध्ये भूमिका बजावणाऱ्या पोटातील उपकारक बॅक्टेरियाला त्रास होऊ शकतो.

सणासुदीच्या दिवसात डायबेटीजला कसं मॅनेज कराल?

अबॉटच्या न्यूट्रिशन बिझनेस विभागाचे असोसिएट डिरेक्टर डॉ. इरफान शेख यांनी सांगितलं की, मधुमेहाचं व्यवस्थापन करणं म्हणजे स्वत:ला खाण्यापासून वंचित ठेवणं असा होत नाही – तर हुशारीने संपूर्ण माहितीनिशी निवड करणं असा होतो. रक्तातील साखरेची पातळी सांभाळण्याची गुरुकिल्ली म्हणजे तुमच्या आहाराचा ग्लायसेमिक इंडेक्स (ऋख) कमी करणाऱ्या पोषक घटकांचे योग्य संतुलन साधणं. जर तुम्ही या घटकांचा विचारपूर्वक आणि योग्य प्रमाणात एकत्र करून तुमच्या आहाराचा ऋख नियंत्रित करू शकता. यामुळे ग्लुकोजची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत होते.


# महिना २ लाख पगार, 'आधार' मध्ये नोकरीची सुवर्णसंधी; अर्ज कसा करायचा?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ हैदराबाद** – सरकारी नोकरी करण्याची अनेक तरुणांची इच्छा असते. तुम्हालाही सरकारी नोकरी करायची असेल तर ही माहिती खास तुमच्यासाठी. भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण विभाग म्हणजेच णखऊ-ख मध्ये नोकरी करण्याची सुवर्णसंधी तुमच्याकडे आहे.णखऊ-ख ही संस्था देशातील लोकांचे आधार कार्ड बनवणे आणि ते रेगुलेट करण्याचे काम करते.

यूआयडीएआयमध्ये हैदराबाद येथील क्षेत्रीय कार्यालयासाठी ही भरती जाहीर करण्यात आली आहे. डेप्युटी डायरेक्टर आणि सिनियर अकाउंट ऑफिसर या पदासाठी ही भरती केली जाणार आहे. या नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांनी लवकरात लवकर अर्ज करायचे आहे.

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण विभागातील या नोकरीसाठी तुम्हाला ीळवरळ.र्सें.ळप या वेबसाइटवर जाऊन अर्ज करायचा आहे. या नोकरीसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख २४ डिसेंबर २०२४ आहे.





या भरतीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराची कमाल वयोमर्याद ५६ वर्ष असायला हवी.चार्टर्ड अकाउंटंट, कॉस्ट अकाउंटंट, एमबीए (फायनान्स) या क्षेत्रात पदवी प्राप्त केलेली असावी. त्याचसोबत ५ वर्षांचा कामाचा अनुभव असणे गरजेचे आहे.डेप्युटी डायरेक्टर या पदासाठी उमेदवारांना मासिक वेतन ६७,७०० ते २,०८,७०० रुपये मिळणार आहे. सिनियर अकाउंट ऑफिसर पदासाठी ५६,१०० ते १,७७,०० रुपये वेतन मिळणार आहे.

# पाडव्याच्या दिवशी पत्नी पतीचं औक्षण का करते? जाणून घ्या पाडव्याचा शुभ मुहूर्त

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.२अमरावती**

दिवाळीचा सण सुरु झाला असून आज सर्वांच्या घरी लक्ष्मीचं पूजन केलं जाणार आहे. या दिवशी आश्विन अमावस्येला दिवाळी साजरी केली जाणार आहे. तर उद्या विवाहितांसाठी खास दिवाळीचा खास दिवस आहे. उद्या म्हणजे २ नोव्हेंबर रोजी कार्तिक शुक्ल प्रतिपदा ही तिथी आहे. कार्तिक प्रतिपदा म्हणजेच दिवाळी पाडवा. या दिवसाला बलिप्रतिपदा असंही म्हटलं जातं.

या दिवसाचं खास महत्त्व?

दिवाळी पाडव्याच्या दिवशी पती-पत्नीच्या नात्याला विशेष असं महत्त्व देण्यात आली. या दिवशी पत्नी आपल्या पतीला ओवाळते. शिवाय यावेळी त्यांना उदंड आयुष्य लाभावं यासाठी देवाकडे प्रार्थना करते. या दिवसाचे वैशिष्ट्य म्हणजे साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला हा दिवस अतिशय शुभ मानला जातो.





### पाडव्याच्या दिवसाचा मूहुर्त

सकाळी ८ वाजून ६ मिनिटांपासून ते सकाळी ९ वाजून ३१ मिनिटांपर्यंत या दिवसाचा शुभ मुहूर्त आहे. त्याचप्रमाणे तसेच सकाळी ५ ते ८ पर्यंत अमृत मुहूर्त आणि दुपारी ३ वाजून १२ मिनिटांपासून ते ४ वाजून ३६ मिनिटांपर्यंत लाभ मुहूर्त असणार आहे. या दिवाळीत पतीला ओवाळण्यासाठी संध्याकाळी ५ ते रात्री ८ पर्यंत मुहूर्त असणार आहे.


RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026



कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# कट्टर नेत्यांच्या बंडामुळे चिंता; दोन दिवस मनधरणीचा फराळ

## वर्षानुवर्षे संघ अन् भाजपत सक्रिय असलेल्यांचेच महायुतीला धक्के

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, भाजपचे कट्टर नेते असलेल्या अनेकांनी बंडखोरी केल्याने भाजप चिंताग्रस्त झाला आहे. इतकी वर्षे तुम्ही आम्हाला देतो देतो म्हटले पण कधीही उमेदवारी दिली नाही, आता आम्ही उमेदवारी अर्ज मागे घेणार नाही असे त्यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना सांगितल्याने चिंता वाढली आहे.

मित्रपक्षांविरुद्धही भाजप नेते उभे आहेत. भाजपविरुद्ध भाजप असे चित्र बऱ्याच ठिकाणी आहे. चांद्यापासून बांद्यापर्यंत भाजपला बंडखोरांनी धक्के दिले आहेत. दिल्ली, मुंबईपासूनच्या नेत्यांनी 'ऑपरेशन समजूत' हाती घेतली असली तरी अद्याप उमेदवारी मागे घेण्याचा शब्द कोणत्याही उमेदवाराने दिलेला नाही, असे खात्रीलायक सूत्रांनी सांगितले.

अमरावतीच्या बडनेरा मतदारसंघात मोठे शक्तिप्रदर्शन करून अर्ज भरणारे माजी स्थायी समिती अध्यक्ष तुषार भारतीय यांनी महायुतीचे उमेदवार युवा स्वाभिमानीचे रवि राणा यांना आव्हान दिले आहे. तर मोर्शी वरुड मतदार संघात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात मैत्रीपूर्ण लढत होत आहे. अमरावती शहरात अजित पवार गटाच्या आ. सुलभा खोडके यांच्याविरुद्ध भाजपचे माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता रिंगणात



आहेत. मेळघाटमध्ये भाजपने केवलराम काळे यांना उमेदवारी दिली पण माजी आमदार प्रभूदास भिलावेकर मैदानात आहेत. या शिवाय ज्योती मालवे-सोळंके आणि सविता अहाकेही लढत आहेत. तिवसामध्ये राजेश वानखेडे या अधिकृत उमेदवाराला भाजपचेच रविराज देशमुख यांनी आव्हान दिले आहे. अचलपूरमध्ये प्रवीण तायडे यांना पक्षाचेच सुधीर रसे भिडले आहेत. तिथे प्रमोद गड्रेल हेही भाजपचे कार्यकर्ते लढत आहेत.दर्यापूर मध्ये शिंदे गटाचे अभिजित अडसूळ यांच्या विरोधात भाजनेमाजी आमदार रमेश बुंदेले हे रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत खामगावमध्ये आमदार आकाश फुंडकर यांची डोकेदुखी अमोल अंधारे यांनी वाढविली आहे. विश्व हिंदू परिषदेचे कट्टर कार्यकर्ते अशी त्यांची ओळख आहे.

गडचिरोली मतदारसंघात माजी आमदार देवराव होळी यांनी पक्षाने उमेदवारी नाकारूनही दंड थोपटले आहेत. तिथे मिलिंद नरोटे भाजपचे उमेदवार आहेत. अहेरीमध्ये मंत्री धर्मरावबाबा आत्राम हे महायुतीचे (अजित पवार गट) उमेदवार आहेत आणि तिथे माजी राज्यमंत्री अंबरिशराव आत्राम (भाजप) बंडखोर आहेत. आर्वी (जि.वर्धा) येथे आमदार दादाराव केचे यांनी उमेदवारी अर्ज भरला, लढविण्यावर ते ठाम आहेत. तिथे उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे पीए राहिलेले सुमित वानखेडे भाजपचे उमदेवार आहेत.

अकोला पश्चिममध्ये भाजपचे विजय अग्रवाल यांच्याविरुद्ध हरिश अलिमचंदानी यांनी बंडखोरी केली. याच मतदारसंघात भाजपचे डॉ. अशोक ओळंबेही लढत आहेत. बुलडाणा मतदारसंघात भाजपचे माजी आमदार विजयराज शिंदे यांनी शिंदेसेनेचे उमेदवार आ.संजय गायकवाड यांच्याविरोधात दंड थोपटले आहेत. आ.गायकवाड यांचे पुत्र मृत्युंजय हे चिखलीत भाजपच्या उमेदवार आ.श्वेता महालेंविरुद्ध लढत आहेत. नाशिकच्या चांदवडमध्ये विद्यमान आमदार राहुल आहेर यांच्याविरोधात त्यांचे बंधू केदा आहेर मागे हटायला तयार नाहीत.

### बंडखोरांना समजविण्याची मोहीम

भाजपचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी एक तातडीची बैठक घेऊन बंडखोरी शमविण्यासाठी पक्षसंघटनेला सक्रिय केले. जिल्हाध्यक्ष आणि अन्य नेत्यांनी उमेदवारांची तातडीने मनधरणी करावी अशा सूचना दिल्या. बंडखोर उमेदवारांच्या निकटवर्तीयांचीही त्यासाठी मदत घ्या असे सांगण्यात आले.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुरक्षेत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ नागपूर :** -भाजपचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दिवाळीच्या दिवशीही त्यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या देवगिरीवर प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत बंडखोरांची समजूत घालण्यात व्यस्त असताना त्यांच्या धरमपेठ येथील निवासस्थानी मात्र सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे. या संदर्भात स्वतः फडणवीस यांना विचारले असता त्यांनी याबाबत तुम्ही पोलिसांनाच विचारा असे उत्तर दिले. पोलिसांनी दिलेल्या



माहितीनुसार, निवडणूक पार्श्वभूमीवर ही सुरक्षा वाढ करण्यात आली आहे. एसआयडीकडे मिळालेल्या इनपुटनुसार ही सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. स्वतः फडणवीस नागपुरातील दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या काळात त्यांच्या निवासस्थानी राज्यभरातून भेटणाऱ्यांची गर्दी लक्षात घेता ही सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे. आधीच झेड सिक्युरिटी असलेल्या गृहमंत्री फडणवीस यांच्या सुरक्षेत आता अधिक खबरदारी घेतली जात आहे.

## मतदार यादी अन् बूथ हीच आता युद्धभूमी...

### लोकसभेच्या पराभवानंतर भाजपची नवीन रणनीती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई** - लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा करिष्मा, राममंदिर, कलम ३७० हे मुद्दे तारतील, असा विश्वास असल्याने बूथ पातळीपर्यंतच्या प्रचाराच्या नियोजनाकडे दुर्लक्ष झाले अन् भाजपला त्याचा फटका बसला हे वास्तव समोर आल्यानंतर आता भाजपने नवीन रणनीती आखली आहे. मतदार यादी अन् बूथ हीच युद्धभूमी मानून तिथे लढा, असे आदेश प्रदेश भाजपच्या शुक्रवारी तातडीने झालेल्या बैठकीत देण्यात आले.भाजपचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही ऑनलाइन बैठक घेतली. बैठकीला सर्व प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, सर्व आघाड्यांचे प्रमुख आदी उपस्थित होते. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात दोन मोठ्या नेत्यांच्या सभा होतील, असे नियोजन आम्ही केलेले आहे. यापेक्षा जास्त सभांची अपेक्षा करू नका. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांच्यासह ज्येष्ठ नेत्यांच्या सभा ठरलेल्या आहेत.ऐनवेळी अधिक सभा मागण्याचा आग्रह धरू नका. मोठ्या सभांवर अधिक खर्च आणि वेळ जातो, त्यापेक्षा बूथनिहाय सूक्ष्म नियोजनावर भर द्या, भाजपचा प्रभाव असलेले 'ए' ग्रेडचे बूथ आहेत तिथे भाजपचे १० टक्के मतदान आणि बी, सी, डी ग्रेडच्या बूथवर १० टक्के मतदान वाढेल, याची दक्षता घ्या, असे शिवप्रकाश आणि बावनकुळे यांनी बैठकीत सांगितले.

लहान-मोठ्या विविध समाजांच्या कल्याणासाठी महायुती सरकारने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने गेल्या वर्षभरात अनेक निर्णय घेतले. महामंडळांची निर्मिती आणि इतरही असे अनेक निर्णय आहेत. त्या-त्या समाजात प्रभाव असलेल्या २६९ नेत्यांची एक यादी प्रदेश भाजपने तयार केली असून, हे नेते विविध भागांमध्ये जाऊन या निर्णयांची माहिती देणार आहेत.

#### 'लाडकी बहीण' योजनेवर भर

महाविकास आघाडी सरकार सत्तेत आले तर लाडकी बहीण योजना बंद केली जाईल, हा मुद्दा प्रभावीपणे मांडला जाणार आहे. नागपुरातील एका काँग्रेस नेत्याने या योजनेला उच्च न्यायालयात दिलेले आव्हान, काँग्रेस नेत्यांनी याबाबत केलेली विधाने यांचा संदर्भ दिला जाईल. लाडकी बहीण योजना केवळ निवडणुकीपुरतीच असल्याचा 'फेक नरेटिव्ह' आघाडीने तयार केला आहे.

प्रत्यक्षात या योजनेत वर्षभर पैसा मिळेल याची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे हे लोकांमध्ये जाऊन सांगा, असे निर्देशही आजच्या बैठकीत देण्यात आले. कृषी पंपांचे वीजबिल माफ करण्यापासून अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत आदी शेतकरी हिताचे अनेक निर्णय महायुती सरकारने घेतले त्याच्या प्रचारावर भर देण्यासही बैठकीत सांगण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## प्रचारासाठी मिळणार अवघे १४ दिवस

### मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांसह उमेदवारांची धावपळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**
विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज माघारी घेण्याची मुदत ४ नोव्हेंबर आहे. त्यामुळे निवडणुकीचा प्रचार खऱ्या अर्थाने ५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. प्रचारासाठी अवघे १४ दिवस मिळणार आहेत. या कालावधीत दोनच रविवार मिळणार आहेत. त्यामुळे मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांना मोठी कसरत करावी लागणार आहे.

सध्या दिवाळीची धामधूम असल्याने प्रचार थंडावला आहे. दिवाळी ३ नोव्हेंबरला संपत आहे, तर ४ नोव्हेंबर ही अर्ज माघारीची मुदत आहे. त्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे, तर प्रचार १८ नोव्हेंबरला संपणार आहे. परिणामी प्रचारासाठी अवघे १४ दिवस मिळत आहेत. या कालावधीत केवळ १० नोव्हेंबर आणि १७ नोव्हेंबरला रविवार आला आहे. रविवार प्रचाराचा वार ठरतो.



उमेदवारांचा कस लागणार

प्रचारासाठी अवघे १४ दिवस मिळत असल्याने मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांचा कस लागणार आहे. त्यासाठी सर्वपक्षीय उमेदवारांना प्रचाराचे सूक्ष्म नियोजन करावे लागणार आहे. प्रचार रॅली आणि नेत्यांच्या जाहीर सभा कुठे घ्यायच्या याचे वेळापत्रक करावे लागणार आहे.

सोशल मीडियाचा आधार

सर्वपक्षीय उमेदवार सोशल मीडियावर क्टिव्ह झाले आहेत. या माध्यमातून प्रचार केला जात आहे. आचारसंहिता लागू असल्याने सोशल मीडियावर प्रचार करताना आयोगाने घातलेल्या अटी, शर्तींचे पालनउमेदवारांना करावे लागणार आहे.

## मतदान जनजागृती उपक्रम- दिपोत्सव २०२४...

### एक दिवा मतदाराच्या सन्मानांसाठी...जिल्हा परिषद अमरावती येथे दिपोत्सव साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक, दि.२अमरावती**
दिपोत्सवाला नुकतीच सुरवात झालेली आहे. घरोघरी दिवा लावून दीपावलीचा सण साजरा करणार आहे. त्याचबरोबर महाराष्टात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीची पण सुरुवात झालेली आहे या लोकशाहीच्या उत्सवात आपणा सहभागी होऊन या निमित्य मतदार जनजागृती करीता दिवाळी सणा निमित्य आज अमरावती जिल्हा परीषद मध्ये दिपोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी पणती लावुन व फटाक्यांची आतिशबीजी करण्यात आली.या कार्यक्रमाला जिल्हा नोडल अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.संजीता महापात्र, कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड , जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ पुरुषोत्तम सोंळके



, मुलेविअ अश्विनी मारणे , संजय खारकर , लेखाधिकारी दुच्चके,ज्ञानेश्वर घाटे, सहायक प्रशासन अधिकारी निलेश तालन' राजेश रोंघे ' संजय राठी , तुषार पावडे, पंकज गुल्हाणे , प्रज्वल घोम, सतिश वाघ, संजय येवुतकर , अशोक कोठारी , लिलाधर नांदे , नितीन माहोरे ' श्रीकांत सदाफळे , मिलींद बाबल , विजय कविटकर , बाळकृष्ण आंधळे , किशोर कटक तलवारे , ममता वजीर ,हेमंतकुमार यावले,राजेश सावरकर,श्रीनाथ वानखडे उपस्थित होते. यावेळी सीईओ मॅडम म्हणाल्या की,अमरावती जिल्हयात डतएएझ च्या माध्यमातून मतदार जनजागृतीचे विविध उपक्रम आपण हाती घेतलेले आहेत. मागील लोकसभा निवडणूकीचे वेळी आपल्या सर्वाच्या प्रयत्नातून अमरावती जिल्हयाची मतदानाची टक्केवारी वाढली होती. यावेळी सुध्दा सर्वच मतदारांपर्यत आपण पोहचवून त्यांना कर्तव्याची जाणीव करुन देणार आहोत. दिवाळीसोबतच आपण लोकशाहीचा उत्सवात एक दिवा मतदाराच्या सन्मानासाठी लावणार आहोत.शहर व जिल्हयास्तरावर या उपक्रमाची सुरवात केलेली आहे.. ज्यामध्ये मतदार संघातील नागरीकांचा सहभाग, महिला आर्थीक विकास महामंडळ, महिला व बालविकास विभाग आणि इतर कार्यालयातील अधिकारी कर्मचा-यांना एकत्र येवून एक लाख कुटूंबापर्यत मतदार जनजागृतीचा संदेश घेवून जाण्याचा संकल्प केलेला आहे. उत्सव लोकशाहीचा सन्मान मतदारांचा.. या थीमवर दीपोत्सव करुन मतदार जनजागृती केलेली आहे. तालुकास्तरावर एकत्रित येवून मतदारांच्या सन्मानासाठी दीपोत्सवाच्यामाध्यमातून मतदार जनजागृती करावी असे आवाहन केले.

## अमरावती करांनी उत्सहात साजरी केली दिवाळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती** देशासह जगभरात दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. देशातील प्रत्येक घर दिव्यांनी उजळून निघत आहे, तर दुसरीकडे परदेशातही दिवाळी साजरी होत आहे. एम्पायर स्टेट बिल्डिंग गुरुवारी दिवाळीनिमित्त दिव्यांनी उजळून निघाली. चमकणारे दिवे अंधारावर प्रकाशाच्या विजयाचे प्रतीक आहेत. दिवाळी साजरी करण्यासाठी सर्व शासकीय इमारती,पोलीस ठाणे मॉल,दुकाने हे अंधारावर प्रकाशाच्या विजयाचे प्रतीक आहे.दिव्यांनी उजळून निघाली. दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव असला, तरी या सणाचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे प्रियजनांमध्ये होणारी भेटवस्तूंची देवाणघेवाण! पाडवा व भाऊबीजेमुळे कुटुंबातील सर्वांना दिवाळी सामावून घेते. याशिवाय उद्योजक, व्यावसायिक, कंपनी कार्यालये, विविध संस्था आदी सर्व ठिकाणी भेटवस्तूंचे उत्साहाने आदानप्रदान होते

**पारंपरिक ते आधुनिक**- बहीण-भावादरम्यानच्या भेटवस्तूंसाठीचे साडी, ड्रेस मटेरियल, शर्टिंग वगैरे पारंपरिक प्रकार कधीच मागे पडले आहेत. गेल्या काही वर्षांत याची जागा पेंडंट, महागडी परफ्युम्स, डीओड्रण्ट, वॉलेट्स, उत्तमोत्तम पुस्तके, चॉकलेट पॅक्स आदींनी घेतली आहे. यंदाही हाच ट्रेंड आहे. मॉल, ऑनलाइन मंच आदी ठिकाणी भेटवस्तूंच्या याच पर्यायांना सर्वाधिक मागणी आहे. भाऊबीजेच्या आधी येणारा पाडवा 'व्हाइट गुड्स' अर्थात फ्रिज, वॉशिंग मशिन, एसी आदींच्या उलाढालीसाठी परिणामकारक ठरतो. एका आघाडीच्या इलेक्ट्रॉनिक शोरूम व्यवस्थापकाने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा व्हाइट गुड्सच्या विक्रीत किमान ३० टक्के वाढ होण्याची चिन्हे आहेत. क्रिकेट वर्ल्डकपमुळे टीव्हीची तडाखेबंद विक्री झाल्यानंतर दिवाळीनिमित्त वॉशिंग मशिन, फ्रिज व मायक्रोवेव्ह ओव्हन या महिलांच्या जिव्हाळ्याच्या वस्तूंच्या विक्रीचे प्रमाण सर्वाधिक आहे. दुसरीकडे, नेकलेस, हिऱ्याची अंगठी, नाजूक नक्षीकामाचे दागिने अशा महागड्या भेटवस्तूंच्या विक्रीचा आकडाही यंदा वाढताच आहे.

**कॉर्पोरेट गिफ्टिंगनेही कात टाकली**- कॉर्पोरेट गिफ्टिंगनेही कात टाकली आहे. सुकामेवा अथवा त्यापासून केलेली मिठाई देण्याची प्रथा आजही टिकून आहे. मात्र या क्षेत्रात यंदा ट्रेंड आहे तो इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा. सारेगमा कारवाँचा म्युझिक प्लेअर, ब्लू टूथ स्पीकर, ब्लू टूथ हेडफोन, साउंड बार या महागड्या वस्तूंची चलती आहे. याशिवाय चहा, कॉफीचे विविध प्रकार, विदेशी फळांची करंडी या भेटवस्तूंचीही यंदा भर पडली आहे.

ई-कार्डमुळे क्रांतिकारी बदल

ई-कॉमर्स कंपन्या, सरकारी/खासगी बँका व अन्य मंचांवरून उपलब्ध असणाऱ्या गिफ्ट कार्डनी अक्षरशः क्रांती केली आहे. आजच्या प्रचंड धावपळीच्या काळात सर्वसामान्यांची गरज ओळखून या कंपन्यांनी देऊ केलेली ही कार्ड लाखो लोकांसाठी सोयीस्कर ठरली आहेत. साहजिकच, या कार्डना दिवाळीच्या पार्श्वभूमीवर प्रचंड मागणी आहे. यातही ॲमेझॉन व फ्लिपकार्ट आघाडीवर आहेत. ॲमेझॉनने 'ॲमेझॉन पे'च्या माध्यमातून पे गिफ्ट कार्ड, पे ई-गिफ्ट कार्ड, ब्रँड व्हाउचर्स, कॉर्पोरेट बल्क गिफ्टिंग एवढे प्रकार देऊ केले आहेत. यामध्ये



ई-कार्ड सर्वाधिक विकली जात आहेत, अशी माहिती ॲमेझॉनतर्फे देण्यात आली. ई-कार्डने मात्र यात अभिनव बदल केला आहे. म्हणजे, दूरच्या शहरात किंवा अगदी परदेशात नोकरी-व्यवसाय करणारा एखादा भाऊ बहिणीला भाऊबीजेला भेटू शकणार नसेल, तर त्याच्याकडे आता ई-गिफ्ट कार्डचा पर्याय आहे. हे ई-कार्ड आपल्याला हव्या त्या दिवशी पाठवण्याचेही स्वातंत्र्य आहे. ज्या व्यक्तीला हे ई-कार्ड प्राप्त होते, ती व्यक्ती त्यातील रक्कम कुठेही रीडीम करून मनपसंत खरेदी करू शकते. सोशल मीडियामुळे सारे जग आभासी झाले आहेच, या कार्डमुळे भाऊबीजेची ओवाळणी ही आभासी होऊ लागली आहे!

# राणा दाम्पत्यांनी नेत्रहिन, दिव्यांग, कुष्ठरोगी आणि मतिमंद यांच्या सोबत साजरी केली दिवाळी

## उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील दिल्यात फोनवर शुभेच्छा !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

भाजप,शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले, पिरिपा कवाडे, लहूजी शक्ती सेना, शेतकरी संघटना महायुतीचे युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही हजारो नेत्रहिन, दिव्यांग, कुष्ठरोगी आणि मतिमंद यांच्या सोबत दिवाळी साजरी केली. राणा यांच्या गंगा सावित्री निवासस्थानी येथे सकाळी ९ वाजता हजारो नेत्रहिन, दिव्यांग, कुष्ठरोगी आणि मतिमंद जमले. स्वतः रवी राणा यांनी सर्वप्रथम सर्वांचा आशीर्वाद घेऊन त्यांना दिवाळीची स्नेहिल भेट देऊन शुभेच्छा दिल्या. माजी खासदार नवनीत रवी राणा यावेळी उपस्थित होत्या.



'गंगा सावित्री' या राणा दाम्पत्यांच्या राहत्या घरी नेत्रहिन, दिव्यांग, कुष्ठरोगी आणि मतिमंद एकत्र संवाद साधताना रवी राणा आणि नवनीत राणा यांचे डोळे भरून आले. आपण सर्व वंचित घटकांच्या सेवेसाठी नेहमी तत्पर आहो. असे म्हणत रवी राणा यांनी सांगितले की, महायुतीचे शासन लवकरच सर्व दिव्यांगाचा पगार वाढ करणार आहे. खासदार म्हणून नवनीत रवी राणा यांनी लोकसभेत आपला आवाज बुलंद करुन महाराष्ट्रातील सर्व दिव्यांगाच्या पगारात वाढ करण्यात यशस्वी झाली होती. दर वर्षी आमदार रवी राणा यांच्या पुढाकाराने हजारो नेत्रहिन, दिव्यांग, कुष्ठरोगी आणि मतिमंद यांच्या सोबत दिवाळी साजरी करतात. त्यांच्या सोबत दिवाळीचा आनंद लुटतात.

राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षा तर्फे आयोजित या हृदयस्पर्शी कार्यक्रमात जयंत वानखडे, कस्तुरे काका, माजी नगरसेविका सुमतीताई ढोके, सुखदेव तरडेजा काका, देवकर, मकसुद भाई, मनीष गवई, राजेश कोरडे समवेत युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दर वर्षी आमदार रवी राणा आणि नवनीत राणा दिव्यांगाचा सोबत दिवाळी साजरी करुन त्यांच्या आनंदात सहभागी होतात. आधी वंचितांची दिवाळी, या आपल्या घोषवाक्याप्रमाणे मागील कित्येक वर्षांपासून रवी राणा ही आदर्श दिवाळी साजरी करत आहेत.यावेळेस जयंतराव वानखडे, शैलेंद्र कस्तुरे, सुमती ढोके, सुखदेव तरडेजा, अर्चना तालन,मकसूद भाई,मनीष गवई, कमल किशोर मालणी,अविनाश तापडीया, हरीशंकर चरपे,कविता ताई, सत्यंतसिंग लोटे,राजेश कोलाडे,प्रकाश कटाने,राजेश कोरडे,आदी पदाधिकारी उपस्थित होते.




### दिव्यांगाना तिन सिलेंडर देण्यासाठी सकारात्मक



फडणवीसआपल्या व्यस्त कार्यक्रमातून वेळात वेळ काढून उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीयावेळी नेत्रहिन दिव्यांग, कुष्ठरोगी आणि मतिमंद अश्या हजारो वंचितांना रवी राणा यांच्या फोनवर दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी हजारो दिव्यांगाचे आग्रहाखातर उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवर्जून सांगितले की, लवकरच दिव्यांगाना निःशुल्क तिन सिलेंडर देण्याचा निर्णय घेण्यात येईल. सोबतच संपूर्ण महाराष्ट्रात दिव्यांगाना दर माह पगारात वाढ करण्यात येणार आहे.

# शिष्यवृत्तीला उशीर झाल्यास विद्यापीठ, महाविद्यालय जबाबदार

## उच्च शिक्षण संचालनालयाचे निर्देश; प्रलंबित अर्जांची पडताळणी करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई :-** उच्च शिक्षणातील शिष्यवृत्तीच्या थेट लाभ हस्तांतरणासाठी महाडीबीटी संकेतस्थळावर गेल्या तीन वर्षांपासूनचे अर्ज प्रलंबित असल्याचे निर्दर्शनास आले आहे. त्यामुळे या प्रलंबित अर्जांची तातडीने पडताळणी करण्याचे निर्देश उच्च शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. प्रलंबित अर्जांबाबत प्रश्न उद्भवल्यास संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, महाविद्यालयांचे प्राचार्य जबाबदार राहतील, असेही स्पष्ट केले आहे.




याबाबत पुणे विद्यापीठ, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र विद्यापीठ, टिळक महाराष्ट्र, एसएनडीटी, डेक्कन कॉलेज अभिमत, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठासह संलग्न महाविद्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत. महाविद्यालय स्तरावर २०२० पासून आतापर्यंत चार वर्षांत अनुक्रमे ९१, ११६, १८४, ५३९ अर्ज प्रलंबित आहेत. तर, दुसऱ्या हप्त्यासाठी हेच आकडे अनुक्रमे ५०१, ५०२, ८५६, २ हजार २४० असे नोंदवण्यात आले आहे.

### अर्ज पडताळणीनंतरच शिष्यवृत्ती

'महाडीबीटी'वर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांबाबत रोजच्या रोज कार्यवाही आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालय स्तरावरून पडताळणी करणे गरजेचे आहे. महाडीबीटी संकेतस्थळ, राष्ट्रीय शिष्यवृत्ती संकेतस्थळावरील प्रलंबित अर्जांची पडताळणी झाल्यानंतर शिष्यवृत्ती जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय, विद्यापीठ स्तरावर एकाही विद्यार्थ्याचा अर्ज प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट, उचल नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती :** एसटी महामंडळाच्या राज्यभरातील कर्मचाऱ्यांना यंदा दिवाळी भेट आणि अग्रिम रक्कमही मिळाली नाही. त्यामुळे कर्मचारी संतापले असून भाजप नेते गोपीचंद पडळकर यांच्या संघटनेकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे नेते व महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांचा निषेध करण्यात आला.



एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट द्यावी, अग्रिम रक्कम द्यावी अशी मागणी महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीमध्ये सहभागी विविध कामगार संघटना आणि भाजप नेते गोपीचंद पडळकर यांच्या सेवा शक्ती संघर्ष एस. टी. कर्मचारी संघ, महाराष्ट्र यांनी केली. महामंडळानेही दिवाळी भेट आणि अग्रिम देण्याबाबतची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले. परंतु, प्रत्यक्ष दिवाळी आली तरी भेट वा अग्रिम रक्कमही मिळाली नाही. यावर प्रतिक्रिया मिळवण्यासाठी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्याशी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही. महामंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी गिरीश देशमुख यांनी मात्र शासनाकडून अद्याप निर्णयाबाबत काहीच कळवण्यात आले नसल्याचे मान्य केले.

# सावधान! दिवाळीत मिठाई विक्रेत्यांकडून ग्राहकांची लूट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर-** दिवाळीत मोठ्या प्रमाणावर मिठाईसह इतर पदार्थांची विक्री होते. या काळात काही विक्रेते अवास्तव नफा कमावण्यासाठी एकीकडे भेसळ तर दुसरीकडे ग्राहकाला मिठाई डब्यात ठेवून त्याचे वजन करून विकतात. त्यामुळे मिठाईच्या दरात डब्याचीही ग्राहकाला विक्री होते. या फसवणुकीबाबत अ. भा. ग्राहक पंचायतने बरेच मुद्दे मांडले आहे. त्याबाबत आपण जाणून घेऊ या.



दिवाळीमध्ये काही विक्रेते मिठाई, तेल, तुप, खोवा व इतर खाद्यपदार्थांमध्ये जास्त नफा कमावण्यासाठी मोठ्या प्रमाणात भेसळ करून नागरिकांच्या जिवांशी खेळतात. या काळात मिठाईसह इतर खाद्य पदार्थांची कोट्यावधींची उलाढाल होते. या पदार्थात भेसळ करण्याचे प्रमाण वाढत असून यावर अंकूश ठेवण्यासह कारवाईची जबाबदारी अन्न व औषधी प्रशासनाची आहे. परंतु थातूर मातूर कारवाई करन वेळ काढला जातो. या भेसळीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.दरम्यान जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकांमध्ये वारंवार ग्राहक पंचायतने आवाज उठविल्यावरही थातूर-मातूर कारवाईतून नागरिकांच्या तोंडाला पाने पुसल्या जात असल्याची खंतही अ. भा. ग्राहक पंचायतने प्रसिद्धीपत्रकातून व्यक्त केली. नियमाप्रमाणे विक्रेत्याने फक्त मिठाईचे वजन करून नंतर ते स्वतःच्या दुकानाची जाहीरात करणाऱ्या डब्यामध्ये ठेवून ग्राहकांना दिले पाहिजे. परंतु विक्रेते डब्यांमध्ये मिठाई ठेवून वजन करून ग्राहकाला देतात. त्यामुळे मिठाईच्या दरात डब्याची विक्री होऊन ग्राहकाची फसवणूक होत आहे. एका डब्याचे वजन साधारण ५० ते १०० ग्रॅम असते म्हणजे एवढी एवढी मिठाई ग्राहकांना कमी दिली जाते. हा गंभीर प्रकार असतानाही वजनमाप खाते (वैधमापन शास्त्र विभाग) केवळ तमाशा बघतो. तातडीने ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग आणि वैधमापन शास्त्र विभागाकडून अस्थापनांची तपासणी करून दोषींवर कडक कारवाई करायला हवी, अशी मागणी अ. भा. ग्राहक पंचायतचे पश्चिम क्षेत्रीय संघटन मंत्री गजानन पांडे यांनी केली.

# विधानसभा निवडणुकीपूर्वी शरद पवार गटाला मोठा दिलासा

## निवडणूक आयोगाने दिला महत्त्वाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**मुंबई दि.२-** राज्यात सध्या विधानसभा निवडणुकांचा रणसंग्राम सुरु झाला आहे. येत्या २० नोव्हेंबरला राज्यात विधानसभा निवडणुकांसाठी मतदान होणार आहे. तर २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहे. यंदा विधानसभा निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकासआघाडी अशी लढत पाहायला मिळणार आहे. आता विधानसभा निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी शरद पवार गटाला मोठा दिलासा मिळाला आहे. निवडणूक आयोगाने 'ट्रम्पेट' चिन्हाचं 'तुतारी' हे मराठी भाषांतर रद्द करण्याचा निर्णय घेतला आहेत. तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या चिन्हाचं नाव मात्र तुतारी वाजवणारा माणूस हे कायम ठेवले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने नुकतंच एक पत्रक जारी केले आहे. भारत निवडणूक आयोगाने दिनांक २६ मार्च २०२४ रोजी निर्गमित केलेल्या मान्यता प्राप्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय पक्षांच्या यादीमध्ये महाराष्ट्र राज्यासाठीच्या राज्यस्तरीय पक्षांच्या यादीमध्ये नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी–शरदचंद्र पवार या पक्षाचा समावेश केला आहे. या पक्षाला तुतारी'' हे चिन्ह देण्यात आले होते. या चिन्हाचे मराठी भाषांतर निवडणूक चिन्हांच्या तक्त्यामध्ये तुतारी वाजविणारा माणूस असे करण्यात आले होते. या दोन्हीही चिन्हांमध्ये सार्धम्य असल्याने प्रचारा दरम्यान मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला होऊ शकतो. त्यामुळे तुतारी हे मुक्त चिन्ह असलेल्या चिन्हाचे मराठी भाषांतर ट्रम्पेट असे केले जावे, अशी विनंती राष्ट्रवादी शरद पवार गटाने केली होती. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडे ही विनंती करण्यात आली होती.




ट्रम्पेट या मुक्त चिन्हाचे मराठी भाषांतरण तुतारी ऐवजी ट्रम्पेटच केले जाणार आता केंद्रीय निवडणूक आयोगाने ही विनंती मान्य केली आहे. त्यामुळे यापुढे मुक्त चिन्हांच्या यादीमधील ढींींशिीं या मुक्त चिन्हाचे मराठी भाषांतरण तुतारी ऐवजी ट्रम्पेट असे करण्यात येणार आहे. यासंदर्भातील सुधारित निवडणूक चिन्हांचा तक्ता झऊऋ मध्ये उपलब्ध करण्यात आला आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ संदर्भातील निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करतेवळी व अन्य आवश्यक प्रयोजनासाठी सुधारित तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार ट्रम्पेट या मुक्त चिन्हाचे मराठी नाव तुतारी ऐवजी ट्रम्पेट असे दर्शविण्यात यावे, असेही आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

त्यासोबतच निवडणूक चिन्हांच्या तक्त्यातील काही निवडणूक चिन्हांना इंग्रजी नावाप्रमाणे मराठी नाव दर्शविण्यात आले आहे. उदा. एअर कंडिशनर, ऑटो रिक्शा, बॅट, बॅटरी टॉर्च, ब्रेड टोस्टर, ब्रश, ब्रीफकेस, केक, कॅलक्युलेटर, कॅमेरा, लॅपटॉप, हेडफोन, हेलमेट, टेबल इत्यादी नावांबद्दल निवडणूक आयोगाने असंही निवडणूक आयोगाने स्पष्ट केलं.

# तळेगाव ठाकुर येथे दिवाळीमध्ये गवळीनीची परंपरा कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२तिवसा**

अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकुर मध्ये दिवाळी निमित्य गवळण नृत्याची परंपरा आजही कायम आहे.दिवाळी निमित्य तळेगाव ठाकुर मध्ये गण गौळणाचा मोठ्या प्रमाणात उत्साह पाहायला मिळाला.गौळण मध्ये माई कपिला गाय हरवी,दूध भरून देते चरवी, सेवा पदरान राहशील ग, तुला आदर सन्मान होईल ग या गाण्यावर गवळीने चे नृत्य विशेष लक्ष वेधले.पूर्वीच्या काळी दिवाळी च्या निमित्य गावोगावी गवळीनी कडून लोकांचे मनोरंजन केले जायचे.मात्र कालांतराने मनोरंजनाचे साधने बदलली मात्र लोककला असलेल्या गवळण ग्रामीण भागात आजही तितकाच मान आहे आणि यामुळे याच कार्यक्रमाला दिवाळी दरम्यान चांगला प्रतिसाद मिळतो.तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकुर मध्ये गवळणी नृत्यचा उत्साह पाहायला मिळतो.तळेगाव ठाकुर मध्ये जिल्ह्यातील नागरिक गवळण पाहण्यासाठी एकच गर्दी करतात.पुरुष वर्गस्त्रियांचे वस्त्र परिधान करून गवळणी नृत्य सादर करतात.तळेगाव ठाकुर मध्ये जगन गडपायले,विपुल कुबडे व पाचपांवली मार्फत गवळण काढतात.या गवळण मध्ये जमा झालेली रक्कम धार्मिक व सामाजिक कार्यात लावतात.



# वृद्धांसह तरुणांचीही उपस्थिती

## कार्तिक मासात पहाटे होतोय काकड आरतीचा गजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अचलपूर**

उठा जागे व्हा रे आता, स्मरण करा पंढरीनाथा!' अशा भक्तिमय भजनांनी पहाटेची सुरुवात होते. भल्या पहाटेस मंदिरातून येणारे काकड आरतीचे सूर कानी पडताच प्रसन्नता अनुभवास येते. 'पातकांच्या राशी काकड आरती देखिलीया' असे उपदेशपर अभंग कानी पडतात.



कोजागरी अश्विन शुद्ध पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवसापासून काकड आरतीला सुरुवात होते. हिंदू धर्मात काकड आरतीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. याच महिन्यात दिवाळी हा धार्मिक सण येतो. या महिन्याचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजेपहाटेच्या सुमारास भाविकगण काकड आरतीत असा सहभाग घेतात.

महिनाभर पहाटे पहाटे आरतीचा गजर केला जातो. काकड तालुक्यातील बहुतांश सार्वजनिक हनुमान मंदिरात भजन मंडळी, वारकरी, गावातील भक्तगण काकड आरतीची पिढ्यानपिढ्यांची परंपरा आजही तेवढ्याच उत्साहात जोपासत आहे. काकड आरतीसाठी भाविकांची गर्दी होत असते.

पहाटेस उठून स्नान करून शुचिर्भूत होऊन, भाविक भक्तगण मंदिरात एकत्र जमा होऊन भजन, आरती व हरिनामाच्या भारदार आवाजात गजर करीत आहेत.काकड आरतीच्या सुमधुर स्वरांनी जाग येत असून, सुरू असलेल्या कार्तिक मासात भक्तीचा सुगंध न दरवळत आहे. रामप्रहरी काकड आरती, अभंग, पांगुळ, वासुदेव, गवळण, भूपाळीचे सूर आणि टाळ-मृदंगाचा गजर सुरू होऊन दिवस उजाडेपर्यंत ऐकायला मिळतात. 'उठा उठा साधुसंत, साधा आपुलाले हित, गेला हा नरदेह मग कैसा भगवंत!' अशाप्रकारे विविध अभंग भजन मंडळी एक ते दीड तास भक्तिरसात तल्लीन होऊन गातात.

### काकड आरतीचे महत्त्व

'काकड' हा मराठी शब्द वातीपासून बनलेला दिवा असा त्याचा अर्थ होतो. पावसाळा संपलेला असतो. वातावरणात थंडीची सुरुवात होते. त्यादरम्यान कोजागरीपासून या प्रसन्न वातावरणात काकड आरतीची सुरुवात होते. पहाटेच्या वेळी विविध संतांच्या अभंगांद्वारे जनजागृती करणे, हे एक कारण यामागे आहे. जुन्या पिढीबरोबर तरुणांचीही विशेष उपस्थिती है काकड आरतीचे वैशिष्ट्य आहे.

# खरड्याच्या बॉक्ससह मिठाईचे वजन

## शिळी आणि भेसळयुक्त मिठाईची सर्रास विक्री 'बेस्ट बिफोर'चे फलक बेपत्ता, कारवाई शून्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

राज्य सरकारच्या नियमानुसार खरड्याच्या बॉक्ससह मिठाईची विक्री करता येत नाही. मात्र, हे नियम झुगारून हॉटेल आणि रेस्टॉरंट चालकांनी डब्यासह मिठाईची विक्री करून सरकारच्या नियमाचे उल्लंघन केले. यामुळे किलोमागे ६० ते ८० ग्रॅमपर्यंत मिठाई कमी मिळाल्याने ग्राहकांचे नुकसान होत आहे. अशा फसवणुकीकडे अन्न व औषधी प्रशासन विभाग आणि वैधमापनशास्त्र विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचा फायदा विक्रेत्यांना मिळाला. ग्राहकांची फसवणूक करून विक्रेत्यांनी कोट्यवधींचा फायदा मिळविला.

सदर प्रतिनिधीने राजकमल ,श्याम चौक, राजापेठ,जयस्तंभ चौक, जवाहर गेट, भागातील काही हॉटेल्सची पाहणी केली असता, मिठाई विक्रेते जाड खरड्याच्या डब्यासह मिठाईचे वजनकरताना दिसून आले. विचारणा केली असता आम्ही अशा प्रकारे मिठाईची विक्री करत असल्याचे सांगितले. आकडेवारी पाहता दिवाळीला अमरावती शहरात हजारो टन मिठाईची विक्री होते. याची किंमत कोट्यवधींच्या घरात आहे. यावरून फसवेगिरीचा अंदाज येऊ शकतो. अर्थपूर्ण व्यवहारामुळे विभागाचे अधिकारी डोळेझाक करतात. जास्त वजनाचे मिठाईचे बॉक्स (६० ते ८० ग्रॅम) विक्रेते तयार करून घेतात आणि एवढी मिठाई ग्राहकांना कमी दिली जाते.



### अधिकारी कारवाई करीत नाहीत

कमी वजन आणि भेसळीच्या माध्यमातून ग्राहकांची शुद्धफसवणूक होत असल्याची तक्रार अनेक नागरिकांनी वैधमापन शास्त्र विभाग आणि अन्न व औषध प्रशासन विभागाकडे केली आहे. त्यानंतरही कारवाई करण्यात येत नाही. यावरून व्यापारी आणि विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये साटेलोटे तर नाही ना? अशी शंका आहे. दिवाळी सणा सणात दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रितरीत्या कारवाई करावी आणि विक्रेत्यांना धडा शिकवावा, अशी मागणी ग्राहक पंचायतने केली आहे.

# उकाड्याच्या प्रभावामुळे विजेची मागणी २५ हजार मेगावॅट पार

## कृषिपंपाचा वापरही वाढला : ऐन दिवाळीत युनिट बंद झाल्याने चिंता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

पावसाळा संपताच ऑक्टोबरमध्ये उकाडा वाढल्याने राज्यातील विजेची मागणी २५ हजार मेगावॅटहून अधिक झाली आहे. महिन्याच्या सुरुवातीला मागणी २१ ते २२ हजार मेगावॅट इतकी होती. दुसरीकडे अनेक वीजनिर्मिती प्रकल्प बंद असल्याने महावितरणची चिंता वाढली आहे. मागणी अशीच वाढत राहिल्यास महाग वीज खरेदी करण्याची वेळ येऊ शकते.




ऑक्टोबरमध्ये तापमान वाढल्याने शहरांमध्ये विजेची मागणी वाढली आहे. दुसरीकडे ग्रामीण भागातील कृषिपंपांच्या वीज जोडणीची मागणीजवळपास दुपटीने वाढली आहे. सप्टेंबरच्या तुलनेत ग्रामीण भागातील शेतीसाठी विजेचीमागणी दुपटीने वाढली आहे. संपूर्ण राज्यात अशीच परिस्थिती आहे. यामुळे ३० ऑक्टोबर रोजी मागणी २१- २२ हजार मेगावॅटवरून २५,२१२ मेगावॅट झाली आहे.त्यात दिवाळीच्या रोषणाईमुळे विजेचा वापर वाढण्याची शक्यता आहे, अशा परिस्थितीत महावितरण सतर्क झाली आहे.

कंपनीचे म्हणणे आहे की, ही परिस्थिती दरवर्षी उद्भवत असल्याने, याला सामोरे जाण्यासाठी आधीच नियोजन करण्यात आले आहे. पॉवर एक्स्चेंजमधून वीज खरेदी केली जाईल. अल्पकालीन वीज खरेदी करारही करण्यात आले आहेत.

### एनटीपीसीचा गॅस प्रकल्प ठप्प

वीजनिर्मिती अनेक युनिटही ठप्प असतानाच, महाराष्ट्राला वीजपुरवठा करणाऱ्या एनटीपीसीचे कवास व कंधार येथील गॅसवरील वीज प्रकल्प ठप्प आहेत. मौदा औष्णिक वीज केंद्राचे एक युनिट बंद आहे. महाजेनकोचा उरण गॅस आधारित प्रकल्प ६७२ मेगावॅट क्षमतेऐवजी केवळ ४५३ मेगावॅट वीजनिर्मिती करत आहे. कंपनीच्या औष्णिक वीज केंद्रांबद्दल बोलायचे, तर भुसावळ, कोराडी आणि परळी येथील प्रत्येकी एक युनिट बंद आहे. खासगी प्रकल्पांचेही दोन युनिट बंद आहेत.

# १६ महिलांकडे राहणार केंद्राध्यक्षांची जबाबदारी

## ३,१६३ महिला कर्मचारी निवडणूक कर्तव्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती :**

विधानसभा निवडणुकीत महिला कर्मचारी निवडणुकीकरिता सज्ज झाल्या आहेत. या निवडणुकीत ३१६३ महिला कर्मचारी निवडणूक कर्तव्य बजाविणार असून यातील १६ महिलांकरिता केंद्राध्यक्षांची जबाबदारी देण्यात आली आहे.

निवडणूक म्हटलं की, प्रशासनाकडून लोकशाही उत्सव साजरा केला जातो. अशातच विविध उपक्रम मतदान वाढविण्याकरिता राबविले जात आहेत. जनजागृती मोहीम राबविली जात असून, महिलांना मतदानाकरिता प्रोत्साहीत करण्याकरिता महिला स्वयंचलित मतदान केंद्रदेखील निर्माण केले जात आहे. अशातच २० नोव्हेंबरला होऊ घातलेल्या निवडणुकीकरिता प्रशासनातील अधिकारी, कर्मचारीदेखील सज्ज झाले आहेत. निवडणुकीच्या कामी बहुतांश कर्मचाऱ्यांना विविध जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात १३ हजारांवर कर्मचाऱ्यांची ड्युटी मतदान आणि मतमोजणीकरिता लावण्यात आली आहे.



या निवडणुकीमध्ये पुरुष कर्मचाऱ्यांसोबत महिला कर्मचाऱ्यांचादेखील पुढाकार दिसून येत आहे. या निवडणूक प्रक्रियेत पहिल्या प्रशिक्षणाकरिता १३ हजार ९१२ कर्मचाऱ्यांना बोलाविण्यात आले होते. यामध्ये १० हजार ७४९ पुरुष तर ३ हजार १६३ महिला कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या महिला कर्मचारी निवडणुकीची जबाबदारी सांभाळणार असून यामध्ये १६ महिला कर्मचारी ह्या केंद्राध्यक्ष म्हणून जबाबदारी पूर्ण करणार आहेत. सोबतच १९ कर्मचारी या प्रथम मतदान अधिकारी व ३ हजार १२८ कर्मचारी या इतर मतदान कर्मचारी म्हणून ड्यूटी बजावणार आहेत. या निवडणूक प्रक्रियेत पुरुषांच्या तुलनेत ३० टक्के महिला कर्मचारी निवडणूक कर्तव्य बजावत आहेत.

# आकाशातही पुढच्या महिन्यात आतिषबाजी

## 'सुपरमून' दिसेल १४ पट मोठा : पाच ग्रह सोबतीला, उल्कावर्षाव अन् 'देवयानी' आकाश गंगेचेही दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर**

दिवाळीत पृथ्वीवर जशी कटाक्यांची आतषबाजी बघायला मिळेल, तशी ती अवकाशातही होणार आहे. सध्या ५ ग्रह सोबतीला आहेतच, यासोबत नोव्हेंबर महिन्यात उल्कावर्षाव पाहायला मिळेल आणि २४ टक्के मोठ्या आकारात सुपरमून' ही बघायला मिळणार आहे. मात्र सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या शेजारी असलेली 'ॲन्ड्रोमेडा' म्हणजेच देवयानी आकाशगंगासुद्धा उघड्या डोळ्यांनी पाहता येणार आहेत.

खगोलतज्ज्ञ प्रभाकर दोड यांनी नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या अवकाशातील घडामोडींची माहिती दिली. आपल्या सौरमालेतील ५ ग्रह सध्या पृथ्वीच्या जवळ आहेत. २३ ऑक्टोबरला बुध ग्रहाचा उदय झाला असून, तो पुढच्या महिनाभर सोबत आहे. सायंकाळच्या वेळी पश्चिमेला बुध आणि त्यासोबत शुक्राचेही दर्शन घडेल. याशिवाय पहाटेच्या वेळी आकाशात डोक्यावर मंगळ आणि गुरू ग्रहाचे दर्शन उघड्या डोळ्याने करता येईल. पूर्व दिशेला शनी ग्रह पाहता येईल. या ग्रहांसोबत ७ ते १४ नोव्हेंबरच्या काळात अंतराळात तयार करण्यात आलेले 'स्पेस स्टेशन' आपण पाहू शकणार आहोत.





१५ नोव्हेंबर रोजीची पौर्णिमा अतिशय खास असेल. यावेळी आपला चंद्र १४ पट अधिक मोठा आणि ३० पट अधिक प्रकाशमान झालेला दिसेल. कारण, या दिवशी पृथ्वी व चंद्राचे अंतर कमी राहणार आहे १७ व १८ नोव्हेंबरला लिओनीड उल्कावर्षावही होणार आहे. धुमकेतू मात्र आपल्या अंतराळातून निघून गेल्याचे दोड यांनी सांगितले.

### २२ लाख प्रकाशवर्ष दूरची 'देवयानी'

आपली पृथ्वी, सूर्य व एकूणच सौरमाला एका आकाशगंगेतच आहेत. अशा असंख्य आकाशगंगा अंतराळात आहेत व पृथ्वीसारखे तिथल्या एखाद्या ग्रहावर जीवन असू शकते. आपल्याच आकाशगंगेच्या शेजारी असलेली आकाशगंगा म्हणजे 'ॲन्ड्रोमेडा' म्हणजेच देवयानी, जी पृथ्वीपासून २२ लाख प्रकाशवर्षे दूर आहे. ही देवयानी आकाशगंगा या महिन्यात पूर्व दिशेला आपल्याला उघड्या डोळ्यांनी बघायला मिळणार आहे. आपल्याला आज ती ज्या अवस्थेत दिसेल, ती तिची २२ लाख वर्षापूर्वीची अवस्था असेल.

# बंदीनंतरही ट्रॅव्हल्समधून मालवाहतूक सुरूच

## आरटीओची डोळेझाक; परिवहनमंत्र्यांचे आदेश कागदावरच



अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

खासगी ट्रॅव्हल्समधून होणारी मालवाहतूक अमरावती शहरात अद्यापही सुरूच असल्याचे दिसून येत आहे. प्रवासी वाहतुकीच्या बसमधून मालवाहतुकीवर बंदी घातली होती. मात्र, आरटीओच्या अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे अद्यापही ट्रॅव्हल्समधून मालवाहतूक होताना दिसत आहे.

सध्या दिवाळीचा हंगाम सुरु आहे आणि या वेळेस अनेक नागरिक हे ट्रॅव्हल्स ने मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. प्रवाश्यांसोबत अमरावती शहरातून बाहेर गावी जाणाऱ्या ट्रॅव्हल्स मध्ये मालवाहतूक अथय प्रमाणात करण्यात येत आहे क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक करणे, प्रवासी बसमधून अवैधरित्या मालवाहतूक करणे यासारखे गैरप्रकार जिल्ह्यात सर्रास सुरू आहेत मात्र आरटीओच्या अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे या कडे कोणतेही अधिकारी लक्ष देण्यास तयार नाही. राज्यात आणि परराज्यांत प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी वाहतूकदारांना विविध नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे. वाहतूकदारांकडून नियमांचे पालन होतेय की नाही हे तपासण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) विभाग केवळ नावापुरतीच मोहीम राबविते.

विना परवाना प्रवासी वाहतूक करणे, परवान्याच्या अटींचा भंग करून वाहन चालविणे, प्रवासी बसमधून अवैधरित्या मालवाहतूक करणे, बसेसचचे योग्यता प्रमाणपत्र नसणे, बसेसची रिफ्लेक्टर, इंडिकेटर, टेल लाईट, वायफर आदींची तपासणी तसेच वाहनांमध्ये बेकायदेशीर बदल केलेले असणे, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक करणे, प्रवाशांकडून जादा भाडे आकारणे यांसारखे गैरप्रकार सर्रास पणे सुरु आहेत.

### कोर्टाच्या आदेशाची पायमल्ली

अमरावती शहरातून जवळपास ५०स्लीपर खासगी ट्रॅव्हल्समधून प्रवासी वाहतूक होते. स्लीपरमध्ये आपतकालीन मार्ग व इतर सुविधा नसते. सुविधा नसलेल्या या प्रकारच्या वाहनांवर कारवाई करण्याचे आदेश मुंबई हायकोर्टाने दिले आहेत. मात्र संबंधित विभागाकडून स्लीपर बसवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. ऐन दिवाळीतही ही धोकादायक वाहतूक नियमांची पायमल्ली करून जोऱ्यात सुरूआहे.

### असा चालतो कारभार

ट्रॅव्हल्स चालकांनी विविध शहरांत व ठिकठिकाणी तिकीट बुकिंग एजंट नेमले आहेत. बुकिंग एजंट आणि ट्रॅव्हल्सचालकांमध्ये कॉन्ट्रॅक्ट कॅरिजेसचा करार केलेला असतो. एखद्यावेळी आरटीओने गाडी पकडल्यास कॉन्ट्रॅक्ट कॅरिजेसचा करारनामा आणि प्रवाशांची यादी दाखविली जाते. याद्वारे नियमातून पळवाट काढली जाते.

# अमरावतीच्या काली माता मंदिरात मिळतो चक्क पैशांचा प्रसाद

## दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**



दिवाळीच्या दिवशी रात्री अमरावती शहरातील कालीमाता मंदिरात मागील ३९ वर्षांपासून भक्तांना चक्क पैशाचा प्रसाद देण्यात येतो. त्यामुळे येथे दर्शनासाठी दिवाळीच्या दिवशी सायंकाळ पासून भक्तांची मोठी रीघ लागलेली असते. काली माता मंदिरात भाविक दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. कारण या मंदिरात भक्तांना बरकत म्हणून प्रसाद स्वरूपात चक्क पैशाचे वितरण करण्यात येते. या मंदिराचे पुजारी येणाऱ्या भक्तांना लाह्यांसोबत पैसेही वाटतात. सदर मंदिराचे पुजारी शक्ती महाराज सांगतात की, १९८४ पासून अमरावती स्मशानभूमी परिसरातील काली माता मंदिरात मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या ठिकाणी लाह्यांसोबत दिवाळीच्या निमित्ताने बरकत म्हणून पैशाच्या स्वरूपात प्रसादाचे वितरण करण्यात येते. याचं कारण सांगताना शक्ती महाराज म्हणतात की, येथील पैसे आपल्या दुकान, घर व तिजोरीमध्ये ठेवल्यास बरकत मिळत असल्याची भाविकांची श्रद्धा आहे. दिवाळीच्या दिवसांमध्ये लक्ष्मीपूजन आटोपून भाविक प्रामुख्याने या मंदिरात दर्शन घेण्यासाठी येतात. सायंकाळी ६ वाजतापासून ते पहाटे ५ वाजेपर्यंत हजारो भाविक येथे लाईन मध्ये लागून बरकत घेतात.

# खासगी वाहनचालक-मालक पदाधिकाऱ्यांच्या संपर्कात

## उमेदवारांनी बुक केली वाहने : रोजगाराची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**





विधानसभा निवडणुकीच्यापार्श्वभूमीवर सध्या खासगी वाहनांना सुगीचे दिवस आले आहेत. अनेक राजकीय पक्षांनी अगोदरच वाहनांची बुकिंग करून ठेवली आहे. तर, काही राजकीय पदाधिकारी आता वाहने बुकिंग करण्याच्या कामाला लागले आहेत. दुसरीकडे उमेदवारांकडे प्रचारासाठी आपलीच वाहने लागावीत, याकरिता खासगी वाहनचालक-मालक पदाधिकाऱ्यांच्या संपर्कात असून, ते भेटीगाठी घेत आहेत.सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. अर्ज मागे घेण्याच्या दिवशी रिंगणातील उमेदवारांचे चित्र स्पष्ट होणार आहे. मात्र, निवडणूक रिंगणात उभे असलेल्या प्रमुख राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी प्रचारासाठी खासगी वाहने अगोदरच बुकिंग केली आहेत. आजपर्यंत दुर्लक्षित असलेल्या आता मागणी वाढल्यामुळे वाहनचालक, मालक आनंदी आहेत. खासगी वाहनचालकांना यंदाची दिवाळी पावली आहे. तसेच निवडणुकीत विधानसभा उमेदवारांच्या खर्चात वाढ केली आहे. त्यामुळे उमेदवारांनी जास्तीत जास्त वाहनांना प्रचारासाठी लावणार आहेत. त्यामुळे चालक, मालकांना सुगीचे दिवस आले आहेत.

# सोशल मीडियावर कार्यकर्त्यांचे 'वॉर'

## निष्ठावान मंडळींनी केले मोबाइलवर व्हॉट्सअॅप ग्रुप तयार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**



विधानसभा निवडणुकीसाठीमंगळवारी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची मुदत होती. त्यामुळे सर्वच दिग्गज नेत्यांनी आपापले उमेदवारी अर्ज शक्तिप्रदर्शन करत दाखल केले. आता माघारीनंतर सर्वच लढतींचे चित्र स्पष्ट होणार आहे. त्यानंतर प्रचाराला खऱ्या अर्थाने जोर चढेल. मात्र, त्याआधीच उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उमेदवारांनी केलेल्या शक्तिप्रदर्शनाच्या गर्दीवरून सोशल मीडियावर चर्चा सुरू आहे.

गावागावांतील कार्यकर्ते आमने- सामने आले असून, शक्तिप्रदर्शनाच्या ठिकाणी असलेल्या उपस्थित गर्दीवरून कार्यकर्त्यांकडून दावे- प्रतिदावे केले जात आहेत. प्रत्येक उमेदवाराकडून सोशल मीडियासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी केली जात आहे. यामाध्यमातून प्रचार सुरु आहे.

कार्यकर्त्यांनाही आले 'अच्छे दिन'विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम सुरू झाला असून, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तसेच छाननी संपली. तत्पूर्वीच कार्यकर्त्यांना 'अच्छे दिन आले आहेत. त्यात सर्वसामान्यांपासून ते कार्यकर्त्यांच्या मैफली आता ढाबे, चहाच्या टपऱ्या, पानटपऱ्यांवर रंगत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. निवडणुकीतील प्रचाराला अजून वेळ असला तरी आपल्या बाजूने कार्यकर्त्यांची फौज असावी यासाठी उमेदवारही कार्यकर्त्यांच्या संपर्कात आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांचाही उत्साह वाढला असून, त्यांना 'अच्छे दिन' आले आहेत. विधानसभा निवडणुकीत आणखी रंग भरणे बाकी आहे. मात्र, आतापासूनच कार्यकर्ते आपला उमेदवार कसा सक्षम आहे, हे सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**सोशल मीडियावर मीम्सचा धुमाकूळ**

उमेदवारांचे कार्यकर्ते आपापल्या परीने जसा होईल तसा प्रचार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. विशेष म्हणजे, सोशल मीडियाचा अधिकाधिक वापर करीत आहेत. काही उमेदवारांनी वॉर रूम तयार केली आहेत. या माध्यमातून काही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर लगेच - त्या पोस्टला प्रत्युत्तर देण्यासाठी दुसऱ्या उमेदवाराच्या टीमकडून पोस्ट व्हायरल केली जात आहे.

# पहाटे धुक्याची चादर अन् बोचरी थंडी मॉर्निंग वॉकला वाढली नागरिकांची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ चांदुर रेलवे**

गेल्या दोन-तीन दिवसांपासून जिल्ह्यातील वातावरणात बदल जाणवत आहे. दिवाळीच्या तोंडावर वातावरणात गारठा जाणवू लागला आहे. पहाटे गारवा असल्याने गुलाबी थंडीची दिवाळीच्या स्वागताच्या मुहूर्तावर चाहूल जाणवू लागली आहे. जाणीव मागील दोन दिवसांपासून होऊ लागली आहे. दरम्यान मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांची संख्या वाढली आहे.दरवर्षी दसऱ्यापासूनच थंडीची चाहूल लागते. मात्र, यावर्षी ऋतू चक्रात काहीसा बदल जाणवत आहे. यंदा पावसाळा लवकर सुरू झाल्याने बळीराजा हरखून गेला होता. याच पावसाने गेले काही दिवस बळीराजासहसर्वांना अचंबित केले होते. सुमारे एक महिनाभर जिल्ह्यात परतीच्या पावसाने थैमान घातले होते. त्यामुळे थंडीचा हंगाम लांबणीवर पडला होता. वातावरणातील बदलामुळे दुपारी कडक ऊन, घामाच्या धारा व सायंकाळी व सकाळी हवामानात गारठा अशा विचित्र वातावरणाचा सामना शहरवासीयांना अनुभवायला मिळाला. मात्र, परतीच्या पावसाने उघडीप दिली असून दिवाळीच्या तोंडावर थंडी सुरू झाली आहे.

# निवडणुकीमुळे कार्यकर्त्यांची चंगळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केले. निवडणुकीचा प्रचार जोमात करायचा म्हटल्यावर कार्यकर्त्यांची मने राखावी लागतात. त्यामुळे कार्यकर्त्यांची चंगळ सुरू आहे. हॉटेल, ढाबे फुल्ल होत आहेत. यंदाची दिवाळी ही मनाजोगी होईल, अशी अपेक्षा कार्यकर्ते बाळगून आहेत. कार्यकर्ते जुळवण्यासाठी इच्छुक उमेदवारांना कसरत करावी लागत आहे. त्यासाठी कार्यकर्त्यांना पार्टी अन् दिवाळी गोड होत असल्याने कार्यकर्त्यांची चांगलीच चंगळ होत असल्याचे पाहावयास मिळत आहे. पुढील दोन-तीन दिवसांत दिवाळी आहे. त्यातच



निवडणूक आल्याने विविध पक्षांच्या उमेदवारांच्या माध्यमातून दिवाळी गोड होणार, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांना आहे.


विधानसभा निवडणुकीची रंगत वाढत चालली आहे. इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात केली आहे.

अनेकांनी गावभेट दौरे सुरू केले आहेत. दिवसभर दौऱ्यात सहभागी झालेले कार्यकर्ते रात्रीच्या वेळी हॉटेल, ढाब्यांवर गर्दी करीत आहेत. त्यांचे मुख्यत्वे नॉनव्हेज जेवणाचे नियोजन केले जात आहे. कार्यकर्त्यांकडून मतदारांच्या मुलांना नोकरीचे, कामधंद्याचे आश्वासन दिले जात आहे.अनेक उमेदवारांकडून दिवाळीनिमित्त भेटवस्तू मिळण्याची किंवा लक्ष्मीदर्शन होण्याची शक्यता आहे.

# आता उमेदवाराला छापता येणार नाही 'नमुना मतपत्रिका' आयोगाने घातले निर्बंध : निवडणूक विभागाचे बारकाईने लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

विधानसभेच्या मतदानावेळी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारातील मतपत्रिका ही उमेदवाराला नमुना मतपत्रिका म्हणून छापता येणार नाही. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यावर निर्बंध राहणार असल्याचे निवडणूक विभागाकडून सांगण्यात आले. राजकीय पक्ष, निवडणूक लढवणारे उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांच्या हितचिंतकांकडून प्रामुख्याने प्रचारासाठी लागणारे पॅम्प्लेट, पोस्टर, फ्लेक्स याचा प्रभावी वापर होत आहे. परंतु, या प्रचार साहित्यावर प्रकाशक, मुद्रक आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता आणि प्रतींची संख्या नसेल तर आरपी ॲक्ट १२७ (अ) नुसार गुन्हा दाखल केला जाणार आहे. याशिवाय, निवडणुकीतील मतपत्रिकेसारखा कागद प्रचारासाठी नमुना मतपत्रिका म्हणून वापरण्यासनिर्बंध आहेत. मात्र, यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या कागदावर नमुना मतपत्रिकेचा वापर उमेदवारांना करता येईल. तसेच सर्व शासकीय, निमशासकीय



कार्यालये, संस्था शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण इत्यादीवर तसेच तालुक्यातील धार्मिक स्थळे, रुग्णालये, शैक्षणिक संस्था वउमेदवार, प्रतिनिधी यांच्या वाहनाच्या ताफ्यात दहापेक्षा अधिक मोटारगाड्या अथवा वाहने वापरण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध राहणार आहे.

**रहदारीच्या अडथळ्यावर उपाययोजना**

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणुकीसंबंधी पोस्टर्स बॅनर्स, पॅम्प्लेटस्, कटआऊटस्, होर्डिंग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीला अडथळा निर्माण होऊ शकेल किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने त्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

**यासाठी परवानगी घेणे बंधनकारक आहे...**

पोलिस अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सकाळी ६ वाजण्यापूर्वी व रात्री १० नंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. दिवसा प्रचाराकरिता फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनिक्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा, सर्व राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार आणि इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनिक्षेपकाच्या वापरासंबंधी घेतलेल्या परवा-नगीची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यंत्रणेला कळवावी लागेल.

# पत्रकार क्षेत्रातील भीष्मपितामह - अनिलभाऊ अग्रवाल

दैनिक अमरावती मंडलचे संपादक अनिलभाऊ अग्रवाल जे आयुष्याच्या ,५३ व्या वर्षात पदार्पण करत आहेत, अमरावतीच्या पत्रकारितेच्या क्षेत्राला नवे आयाम देण्याबरोबरच त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या जोरावर अवघ्या अडीच दशकात स्वत:चे जे एक स्थान निर्माण केले आहे, ते आजच्या तरुण पिढीसाठी तसेच पत्रकारिता क्षेत्रासाठी प्रेरणादायी आहे.तत्कालीन नगरपालिकेच्या शिक्षण विभागात शिक्षक असलेल्या जुगलकिशोरजी अग्रवाल यांच्या सर्वात लहान मुलाच्या रूपात जन्मलेल्या अनिलभाऊ अग्रवाल यांचे बालपण काही अंशी वंचिततेत गेले असे म्हणता येईल, कारण त्यांच्या वडिलांचे त्या वेळी शिक्षकाचे उत्पन्न मर्यादित होते. आणि कुटुंब खूप मोठे होते.तसेच वडील जुगल किशोरजी अग्रवाल यांना पत्रकारितेची खूप आवड होती आणि ते स्वतःच्या खिशातून खर्च करून दोन साप्ताहिके काढत असत. अशा परिस्थितीत घरची आर्थिक परिस्थिती काहीशी हलाखीची होती. अशा परिस्थितीत दुसरा कोणी तरुण असता तर शिक्षण पूर्ण करून स्वत:च्या आणि कुटुंबाच्या गरजा भागवण्यासाठी नोकरी मिळवण्याच्या मार्गावर तो लागला असता. पण १९९४ साली आयुष्याच्या या महत्त्वाच्या टप्प्यावर काहीतरी वेगळे करण्याच्या विचाराने अनिलभाऊ अग्रवाल या मध्यमवर्गीय कुटुंबातील तरुणाने पत्रकारितेच्या क्षेत्रात येण्याचे ठरवले आणि 'दैनिक अमरावती मंडल' नावाचे एक सांध्य दैनिक प्रकाशित करण्यास सुरुवात केली आणि २९ जून १९९४ रोजी दैनिक अमरावती मंडल वाचकांच्या सेवे मध्ये रुजू झाला आणि त्यानंतर जे घडले तो एक इतिहास आहे.गेल्या ३० वर्षांच्या या प्रवासात अमरावती मंडलचे संपादक अनिलभाऊअग्रवाल यांनी बंधू राजेशभाऊ अग्रवाल यांच्या खांद्याला खांदा लावून रात्रंदिवस मेहनत करून अमरावती मंडल ला पश्चिम विदर्भातील एक नावाजलेले आणि विश्वासार्ह नाव बनवले आहे.दुसरीकडे पत्रकारिता क्षेत्राशी निगडीत काही कामही त्यांनी केले, ज्याला एक यश म्हणता येईल.पश्चिम विदर्भातील अमरावती सारख्या लहानशा शहरातील असलेले अनिलभाऊ अग्रवाल हे भारतीय पत्रकार परिषदेसारख्या पत्रकारितेच्या सर्वोच्च संस्थेचे सलग दोन वेळा सदस्य राहिले आहेत.राज्यातील सर्व वृत्तपत्रांच्या हिताच्या दृष्टीने सरकारी जाहिरात धोरणात आवश्यक त्या सुधारणा घडवून आणण्याचे उल्लेखनीय कार्य त्यांनी केले.मुंबई मराठी पत्रकार संघा समवेत अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचा पुनर्जीवित करत नव्या पद्धतीने यशस्वी मांडणी



करण्याचं कार्य त्यांनी केले सर्वांच्या आशीर्वादाने अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष पदी विराजमान होताच एकाच वर्षाततत्कालीन पालकमंत्री व त्यांचे परममित्र श्री. प्रवीणजी पोटे पाटील यांच्या सहकार्याने जिल्हा मराठी पत्रकार भवनाची मुहूर्तमेढ रचली अस म्हणतात की शासकीय काम आणि बारा महिने थांब मात्र अनिल भाऊंच्या नियोजना मुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळ मध्ये या वास्तू चे भूमीपूजन व लोकार्पण त्यांच्या स्वहस्ते करण्याचे काम अनीलभाऊ अग्रवाल यांनी करून दाखविले.अस पाहण्यात येत की जो व्यक्ती वरिष्ठस्तरा वरती एखाद्या संघटने मध्ये जोडल्यास किंवा पद भूषविले असल्यास लहान स्तरावर्ती काम करण्यास असमर्थता दर्शवितात मात्र अनिलभाऊ याला अपवाद ठरतात वरिष्ठ स्थरावरील पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यात जितकी रुची अनिल भाऊना आहे तेवढीच स्थानिक पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यात नेहमीच आग्रही भूमिका त्यांची असते याचा प्रत्येय राज्या च्या विविध भागा मध्ये पत्रकारांन वरती हल्ले होत असताना पत्रकारांचा सुरक्षा करिता राज्यात सर्वप्रथम आवाज उचलणारा व्यक्ती कोणी असेल तर ते अनिल भाऊ अग्रवाल होते राज्या मध्ये पत्रकार सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी व्हावी या करिता राज्य सरकार च्या विरोधात मुक मोर्चा नेला शासन आणि प्रशासनला पत्रकारांच्या हल्ले बाबतजागृत केले त्याची फलश्रुती म्हणून राज्य सरकार ने पत्रकार सुरक्षा कामदा अंमलात आणला. कोरोना कालखंड मध्ये राज्यसरकार तर्फे पोलीस विभाग आणि आरोग्य विभागाला आर्थिक सुरक्षा कवच प्रदान करण्यात आले होते मात्र पत्रकारांचा आर्थिक सुरक्षा कवच समावेश करण्यात आला नाही याचे शल्य अनिल भाऊ ना सतावत गेले त्यांनी जिल्हा मराठी पत्रकार संघाचा वतीने या बाबत राज्य सरकार विरोधात आवाज उचला पत्रकार वेळोवेळी आपत्कालीन परिस्थिती मध्ये आपला जीव धोक्यात घालून ग्राउंड वरती काम करतो आहे त्या मुळे पत्रकारांचा सुद्धा आर्थिक सुरक्षा कवच मध्ये समावेश करावा या करिता सरकार ला विनंती केली आणि त्या नंतर राज्य सरकार ने सुद्धा पत्रकारांचा आर्थिक सुरक्षा कवच मध्ये समावेश केला.अनिलभाऊ विविध संस्था संघटने मध्ये कार्यरत आहे व प्रत्येक संस्था संघटना यांना समान न्याय देण्याचा ते प्रयत्न करतात दिवसाला १८ - १८ तास हा माणूस काम करतो मात्र जे ही करतो ते उत्कृष्ठ करतो व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ञाला ही लाजवेल इतकं परफेक्ट नियोजन हे अनिल भाऊंच असत. पत्रकार पासून झालेली अनिलभाऊंची सुरुवात आज जिल्हामध्ये प्रतिष्ठित बांधकाम व्यावसायिक म्हणून झालेली आहे मात्र अनिलभाउंच पहिलं प्रेम हे पत्रकारिता आहे म्हणूनच त्यांचं दालन सदैव पत्रकारांन करिता खुल असत पत्रकारांचे प्रश्न समस्या सोडविण्या करिता नेहमी आग्रही असतात वेळप्रसंगी शासना विरोधात लडा उभारण्या करिता उभा असतो म्हणूनच अनिल भाऊ अग्रवाल पत्रकारिता क्षेत्रातील भीष्मपितामह ठरतात व माझ्या सारख्या नवंतरुणांचे प्रेरणास्थान आहे अनिलभाऊ माझ्या लेखी केवळ व्यक्ती नसून एक ऊर्जास्थान आहे. अनिल भाऊंना वाढदिवसा निमित्त परमेश्वर चरणी प्रार्थना करतो की त्यांना आरोग्यमय दीर्घआयुष्य लाभो.

**मयुर चौधरी**
**संचालक**
S.M.G. MEDIA SERVICES Amravati

## दिवाळीच्या सुट्यांमध्ये शिक्षण सेवकांचे प्रशिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ वरुड**

पवित्र पोर्टलद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षण सेवकांचे प्रशिक्षण ऐन दिवाळीच्या कालावधीत घेण्यात येत असल्याने शिक्षक संवर्गात नाराजी दिसून येत आहे. दरम्यान, नवनियुक्त शिक्षकांचे प्रशिक्षण दिवाळीनंतर घेण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

पवित्र पोर्टलद्वारे शिक्षण सेवकांची भरती मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. हे शिक्षक कर्मचारी वेगवेगळ्याठिकाणी आपला स्व-जिल्हा सोडून कार्यरत आहेत. अशातच एसबीटीई अंतर्गत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या १० ऑक्टोबरच्या पत्रानुसार ४ ते ११ नोव्हेंबर या कालावधी या प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. हे प्रशिक्षण दिवाळीनंतर घेण्यात यावे, अशी मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे. ऐन दिवाळीत प्रशिक्षण असल्याने शिक्षकांच्या आनंदावर विरजण पडत आहे.